आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १७ एप्रिल २०२४



# चैतन्याचे सुंदरधाम प्रभू श्रीराम...

आधुनिक केसरी न्यूज

**महर्षी वाल्मिकीनीं लिहिलेल्या 'रामायण' या महाकाव्यात प्रभू रामचंद्रांचे रेखाटलेले चित्र एक सर्व गुण संपन्न व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविते. मानवी जीवनातील प्रत्येक प्रसंगाची आपण रामचंद्रांच्या जीवनाशी तुलना केली तर... प्रभू रामचंद्रांची पितृभक्ती, विनम्रता, शांतता प्रिय स्वभाव, चारित्र्यसंपन्नता, कुशल युद्धनीती, मातृप्रेम, मातृप्रेम अशा असंख्य दृष्टिकोनातून प्रभू रामचंद्रांच्या व्यक्तिमत्त्व आपणास दिसून येते. प्रभू रामचंद्राचं व्यक्तिमत्व किती भव्य दिव्य उदात्त होतं हे आपणास सहजपणे लक्षात येतं.**

कैकयी मातेने रामास वनवासात जाण्याचा आग्रह धरला. तेव्हा मातेची आज्ञा मानून क्षणाचाही विलंब न लावता रामाने सर्वस्वाचा त्याग करून वनवासाला जाण्याची वल्कले परिधान केली. राज्य उपभोगाची असक्ती रामाला कधीच नव्हती .आपल्या राज्याचा त्याग करून आपली राज वस्त्रे , राज्य संपत्ती , राज्य चिन्हे , दूर करून कैकयी मातेच्या आज्ञाची परिपूर्णता लगेच केली.

रावण वधा नंतर देखील रामाने लंकेचे राज्य बिभीषणाच्या स्वाधीन केलं. त्याचप्रमाणे बाली वधा नंतर देखील रामाने किष्किंधेचे राजे म्हणून सुग्रीवाला राज्यपदावर बसविले.वनवासाची १४ वर्षाचीं परिपुर्तता झाली. त्यानंतर अयोध्येस परत आल्यावर ( रामाने रावणवधा नंतर ) राज्य करण्यास भरत उत्सुक नाही ना याची आधीच पडताळणी करून पाहिली. यामधून त्याची भातृ भक्ती ही आपणास सहजतेने दिसून येते.

एक वचनी..एक पत्नी राम म्हणून रामाच्या जीवनाचा हा पैलू तर संपूर्ण मानवांनी अंगीकारण्याचा एक आदर्श आहे. सीतेच्या वियोगाने रामाला अतिवदुःख झालेले होते .त्यावेळी सीतामाईचे रूप धारण करून पार्वती रामासमोर येऊन उभी राहिली. त्यावेळी राम विचलीत झाले नाहीत. तसेच रावणाची भगिनी शूर्पणखा हिने एका सुंदर स्त्रीचे रूप धारण करून रामा भुलवण्याचा ..मनमोहित करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी देखील रामाने तिच्याकडे आदराने पाहून तिला वंदन केले. भोग विलासाकडे वळलेल्या आजच्या युवकांच्या समोर प्रभू रामचंद्रांचा हा आदर्श किती अनमोल आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

अयोध्या नगरी बहरलेली आहे. संपूर्ण नगरात आनंदाचे उत्साहाचे वातावरण आहे . असं असताना रामाचा राज्याभिषेक कधी होईल यासाठी सारे प्रजाजन आतुरलेले आहेत.अशा आनंदाच्या वातावरणात कुलूगुरू ऋषीवर्य वशिष्ठांच्या उपस्थितीत राज्याभिषेकाची तयारी देखील झालेली आहे... पण पाहता पाहता संपूर्ण राजदरबाराचा रंगत पालटतो...राजा दशरथानी दिलेल्या दोन वचनांचे राणी कैकयीला स्मरण होते. त्यावेळी कैकयी ती दोन वचने मागून त्याची परिपूर्णता करण्याचा आग्रह धरते. त्यामुळे रामा १४ वर्षे वनवासास पाठविले जाते.

कैकयीला दिलेल्या दुसऱ्या वचनानुसार भरताला राज्यावर बसवावे... हे ऐकल्यावर राजा दशरथ हतबल होऊन जातात. गहिवरून कैकयीला विनवू लागतात. त्यावेळी प्रभू रामचंद्र मात्र एखाद्या दीपस्तंभा सारखे निश्चलपणे उभे असतात.असंख्य वादळे लाटा आढळूनही तो दिपस्तंभ कसा विचलित होत नाही निशान्तपणे शांत उभा राहिलेला असतो.. अगदी तसाच शांतपणे उभे राहून आपल्या पित्याचा तो वियोग पाहतात.मी आईच्या इच्छेप्रमाणे वनवास तयार आहे हे सांगत .. प्रभू रामचंद्रांनी वल्कले परिधान करून वनवासास प्रस्थान करण्यास मी सिद्ध झालेलो आहे हे शांतपणे सांगतात.त्यावेळी आपल्या मातृ भक्तीचा.. पितृ भक्तीचा असा हा अपूर्व सगुण सुंदर चैतन्याचा राम यामधून प्रगट झालेला आपणास दिसतो.

**अयोध्येतील राम मंदिर :** अयोध्येतील राममंदिरात तर रामजन्मोत्सव यावर्षी किती भक्ती भावांनी साजरा केला जाईल हे सांगता येणार नाही . अयोध्येतील राम मंदिराच्या विषयी सांगावयाचे झाले तर . . . अयोध्यातील राम मंदिर हे पाच सभामंडपाचे व तीन मजले असणारे अति भव्य मंदिर आहे . प्रत्येक मजला वीस फूट उंचीचा असलेला आहे . प्रत्येक मजल्यावर 392 खांब तसेच 44 दरवाजे आहेत .मंदिराच्या गर्भगृहात विराजमान झालेली रालल्लाची मूर्ती साडेपाच फूट उंचीची आहे . अयोध्येतील हे मंदिर नागर वास्तुशालीतील बांधण्यात आलेले आहे .मंदिराची पूर्व पश्चिम लांबी 380 फूट आहे . तर रुंदी 250 फूटआहे .मंदिराची उंची 161 फूट आहे . मंदिराच्या पहिल्या मजल्यावर अप्रतिम अशा सर्वांग सुंदर मूर्तीने राम दरबार सजवण्यात आलेला आहे . तसेच राम मंदिरात एकूण पाच सभामंडप आहेत . नृत्य मंडप , रंगमंडप , सभा मंडप , प्रार्थना मंडप , कीर्तन मंडप , प्रत्येक मंडप अत्यंत आखीव रेखीव कलात्मक पद्धतीने तयार केलेला आहे . मंदिरातील प्रत्येक खांबावर विविध देवदेवतांची अतिशय सुंदर कोरीव कातिव अशी शिल्पे साकारण्यात आलेली आहेत . मंदिराचे प्रवेशद्वार पूर्वेस आहे . मंदिरात येणाऱ्या प्रत्येक भक्ताला 35 पायऱ्या चढून आत यावे लागते . दिव्यांग असलेल्या व्यक्तीसाठी मात्र वेगळी अशी सुविधा या ठिकाणी करण्यात आलेली आहे . राम जन्मभूमीवर बांधण्यात आलेले हे रामाचे भव्य दिव्य मंदिर एकूण 70 एकर परिसरात उभे करण्यात आलेले आहे हे मंदिर निसर्गरम्य नयनरम्य अशा वातावरणात उभे करण्यात आलेले आहे मंदिरात च्या परिसर 70 टक्के हिरव्यागार अशा हिरवळीने सुशोभित करण्यात आलेले आहे अशा निसर्गरम्य वातावरणात असे अलोकिक मंदिर पाहून मन सुखावून जाते हेच बाकी खरे . . .

**अयोध्येतील विविध मंदिरे :** आज आपणं घरां घरातून राम जन्मोत्सव साजरा करीत आहोत . गेल्या ५०० वर्षांपासून सारे भारतीय वाट पहात होते त्या अयोध्येत अलौकिक राममंदिर उभं राहिलं ७० एकर परिसरात उभारण्यात आलेलं हे अलौकिक राममंदिर निसर्गाच्या सान्निध्यात वसलेले आहे . ७० एकरातील मंदीराचा ७० टक्के भाग हिरव्यागार हिरवळीने व्यापलेला आहे . मंदिर परिसरात असंख्य वृक्ष . . विविध रंगांची फुलझाडे . .कारंजी . .सरोवरे . . अशा निसर्गरम्य वातावरणातील हे राममंदिर पाहतानां मनं किती सुखावून जाते हे शब्दांतून व्यक्त करता येणार नाही हे बाकी खरं . . राममंदिर परिसरात सुंदर वास्तूकलेचा आविष्कार असलेली इतर मंदिरे देखील पाहून आपणं स्तिमित होऊन जातो . त्यामधे महर्षी वाल्मिकी , महर्षी वशिष्ठ , महर्षी विश्वामित्र , महर्षी अगस्ती , निशादराज , शबरी माता , अहिल्यादेवी या नव्यानं स्थापीत केलेल्या मंदीरा बरोबरच " कुबेर टीला " नावांचे शंकराचे प्राचीन मंदिर देखील जतन करून ठेवलेले आहे . . .

रामायण कालखंडामध्ये ऋषीमुनी नित्य नियमाने पूजा अर्चा करीत असत.. यज्ञयाग , होम हवन, यज्ञसाधना , व्रतवैकल्ये ,नित्य नियमाचे होम हवन ,असे ऋषीमुनी रोज करीत असत. त्यावेळी असंख्य असूर त्यांचा व्रत अभंग करून , यज्ञ कुंडे उद्ध्वस्त करीत असत. अशावेळी अयोध्या नगरीचा युवराज म्हणून रामाने असंख्य असूरांना यमसदनास पाठविले. अनेकांना नामोहरम करून पळवून लावले. विश्वमित्र ऋषींनी तर खूप मोठा यज्ञ आरंभीलेला होता त्यावेळी रामाने दाखविलेल्या आतुलनीय पराक्रम साहस तर महर्षी वाल्मीकाने आपल्या रामायणामध्ये अत्यंत रसभरीत वर्णन करून लिहिलेला आहे .प्रभू रामचंद्रांच्या स्वभावातील हे खूप मोठे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रभू रामचंद्रांच्या जीवनामध्ये असंख्य दुर्धर प्रसंग आलेले असताना देखील त्यांनी विचारपूर्वक निर्णय घेऊन अशा प्रसंगांमध्ये दाखवलेले साहस अतुलनीय होते हे आपणास सहजतेने दिसून येते.

आयोध्या सारख्या मोठ्या साम्राज्याचा राज्याभिषेक ठरलेला असताना त्याचा अत्यंत शांतपणे सहजतेने त्याग रामानी केला .अशा कठीण परिस्थितीत राजा दशरथाचीच समजूत घालून वनवास प्रस्थानकरणे सीतेचेहरण झाल्यानंतर देखीलशांतपणे त्यामधून मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करणे वनमासात जाताना बंधुप्रेमामुळे लक्ष्मणासहित जेव्हा बरोबर येणार म्हटल्यावर शांततेने त्याच अनुमती देणे.. अयोध्येत शांतता राखण्यासाठी भरताला सामोपचाराने सांगून वडील बंधूंच्या नात्याने त्यास परत पाठविणे ..सीताहरण नंतर अनेक मार्गाने अयोध्येवर रामलक्ष्मणाला रावणाचे असुर सतत आक्रमण करीत असताना मनाचा संयम कायम ठेवत रावणाकडे युद्ध नको शांततेच्या मार्गाने आपण हे प्रश्न सोडवूयात... असा प्रस्ताव अंगत वानरराजास शांतीचा प्रस्ताव घेऊन पाठवलेले होते. मग अशा एक ना दोन अनेक प्रसंगातून रामाच्या अंगी साहस असताना देखील त्यांच्या शांत संयमी वृत्तीचे दर्शन आपणास यामधून दिसून येते. मातृ-पितृ भक्त असणाऱ्या राम राज्याभिषेक कारभार सांभाळताना प्रजाहितासाठी अत्यंत कठोर निर्णय देखील घेताना आपणास दिसून येतो.त्याचबरोबर निष्पृहतेने राज्यकारभार सांभाळणारा राम देखील आपणास दिसतो.

प्रभू रामचंद्र हे खूप मोठे शिवभक्त होते. विश्वामित्र ऋषीसह मिथिलेला साम्राज्यात राम..लक्ष्मण आले. सीता स्वयंवरास आल्यानंतर शिवधनुष्यास दोरी बांधण्यापूर्वी.. शिवधनुष्य उचलण्यापूर्वी.. रामाने शिवाची मनात आराधना केली. त्यास मनोभावे वंदन केले. त्यानंतरच रामाने शिवधनुष्य उचलले. सागरावर सेतू बांधण्यापूर्वी सागर तीरावर रामाने प्रथम वाळूचे एक शिवलिंग तयार केलेले होते. त्या शिवलिंगाची यथासांग पूजा केली .त्यानंतरच प्रभू रामचंद्राने सेतू बांधण्याचे कार्यास प्रारंभ केला .अशा कितीतरी प्रसंगांमधून रामाच्या ह्रदयात शिवाबद्दलची अपारभक्ती किती होती हे आपणास सहजतेने दिसून येते. महर्षी वाल्मिकीने लिहिलेल्या या रामायण महाकाव्यात रामाच्या सर्वांग सुंदर सर्वगुणसंपन्न अशा व्यक्ती महत्त्वाचे चित्र अतिशय सुंदरतेनी रेखाटलेले आहे .अशा या प्रभू रामचंद्रांचा जन्मदिवस चैत्र महिन्यातील पहिल्या पंधरवड्यातील नववा दिवस म्हणजे " चैत्र शुद्ध नवमी " या दिवशी अयोध्या नगरीत प्रभू रामचंद्रांचा जन्म झाला. अशा सर्व गुणसंपन्न प्रभू रामचंद्राच्या जीवनातील आदर्श आपणां समोर ठेवून त्यामधील कांही गुण जरी आपल्या जीवनात आले... आपण अंगीकारले तर " रामनवमीची ही फलश्रुती " झाली आहे, असे म्हणावे लागेल...

प्रभू रामचंद्रांविषयी ग.दी. मांनी लिहिलेलं नी सुधीर फडकेंनी गायलेलं गीत रामायण तर अजरामर होवून गेलं.तसेचप्रभू रामचंद्रांच्या विषयी अनुप जलोटांचे मधुर शब्द कानावर येतात नी मनं प्रसन्न होऊन जातं..." मनं में राम , तनं मे राम ,बोलो राम.. राम.." नवोदित गायक किशोर कुलकर्णी यांचे प्रभू रामचंद्रांच्या विषयीचे शब्दंनी शब्द ह्रदयाला सुखावून जाणारे आहेत...शबरी ठाईं आहे राम..कैवल्याचा गाभाराम..

सुमंगलाची पहाट राम..सकल सुखाचा सागर राम..चराचरातील आत्मा राम.. स्वरांकुरात आहे राम..चैतन्याचे सुंदर धाम.. प्रभू राम..राम..राम.. प्रभू रामचंद्रांच्या विषयी लिहावयास माझे शब्दही अपुरे आहेत असंच मला वाटतं...

**बोलो सियावर रामचंद्र की जय...**



सुधीर कोर्टीकर
संपर्क : 97655 53312

प्रायोजक : भावे आणि कंपनी (वाय.एस. फूड्स) एसबीएच कॉलनी, पीर बाजार, 8805286395, छत्रपती संभाजीनगर

भावे आणि कंपनी
वाय एस फुडस्
एसबीएच कॉलनी, पीर बाजार, 8805286395
सुधीर कोर्टीकर 97655 53312



६६ वर्षांची परंपरा असलेले मराठवाड्यातील एकमेव ठिकाण



श्री. यश जयदीप भावे
मो.नं. 8805286395

प्रत्येक सणांसाठी लागणाऱ्या खास पदार्थांचे एकमेव विक्रेते




सौ. स्नेहल यश भावे
मो.नं. 8668554955

मिल्क प्रोडक्ट, होम प्रोडक्ट, बेकरी प्रोडक्ट, उपवासाचे प्रोडक्ट, कोकण प्रोडक्ट, इंस्टंट प्रोडक्ट, ड्रायफ्रूट्स, हेल्थ प्रोडक्ट

स्पेशल मलई चक्का, ड्रायफ्रूट, श्रीखंड, तयार पुरण, देवगड हापूस, आम्रखंड, बासुंदी, सीताफळ, रबडी

कुंभारवाडा 9850019109 | एन-५ सिडको 9325212390 | उल्कानगरी 9763685381 | पीरबाजार 8805286395

आमची नवीन शाखा :- हॉटेल विट्ससमोर, स्टेशन रोड. मो. 9371458704




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## फिटे अंधाराचे जाळे

आधुनिक केसरी

अशा मुलांच्या पालकांसाठी या पुस्तकात पावलापावलावर मार्गदर्शन आहे. वल्लरीच्या प्रगतीतले सगळे टप्पे, सगळ्या अडचणी भाऊंनी काळजीपूर्वक नोंदवून ठेवून सगळ्यांसाठी एक या पुस्तकाद्वारे एक मोलाचे मार्गदर्शन केले आहे. ही अथक जिद्दीची कहाणी आहे.
भाऊ आणि सौ विद्याताई, वल्लरीची आत्या आणि स्वतः वल्लरी यांच्याबद्दल ऐकून भल्याभल्यानी तोंडात बोटे घातली. त्यांच्या अथक प्रयत्नांना सलाम केला. वल्लरीला भेटायला तर सुधीर फडके, श्रीधर फडके सांगलीला गेल्यावर आवर्जून जात असत. प्रख्यात गायिका आशा भोसलेंनी सुद्धा वल्लरीचे कौतुक केले. तरुण भारतचे माजी संपादक आणि व्यासंगी लेखक चं प भिशीकर वेळ मिळाला की तिच्या भेटीसाठी येत असत. तिला पत्र पाठवीत असत. आज भाऊ आणि विद्याताईंना लोक वल्लरीचे आईवडील म्हणून ओळखतात. यातच त्यांच्या प्रयत्नांचे यश आहे. वल्लरीच्या जीवनकथेने प्रेरित होऊन नीलकांती पाटेकर यांनी ' लाईफ इज ब्युटीफुल ' ही २४ मिनिटांची इंग्रजी शॉर्टफिल्म बनवली. ही फिल्म पाहून मुंबई दूरदर्शनचे मुकेश शर्मा यांना ' प्रेरणा पुरस्काराची ' कल्पना सुचली. पहिल्या प्रेरणा पुरस्काराचे मानकरी ठरले वल्लरी आणि तिची आई. मेहता पब्लिकेशन फाउंडेशन तर्फे तिला ' जिद्द ' पुरस्कार देण्यात आला. एप्रिल २००५ मध्ये वल्लरीला ' नवरत्न ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. असे अनेक मानसन्मान वल्लरी आणि करमरकर कुटुंबियांच्या वाट्याला आले.
प्रश्न असा पडतो की त्यासाठी कौतुक कोणाचे करायचे, श्रेय कोणाला द्यायचे ? वल्लरी, भाऊ, विद्याताई की तिची आत्या ? हे श्रेय या सर्वांचेच आहे. ' ये कहानी हैं दियेकी और तुफानकी...' विपरीत परिस्थितीचे भयंकर तुफान आले पण या सर्वांनी आशेचा, प्रयत्नांचा दीप मालवू दिला नाही. त्यातूनच प्रकाशाच्या वाटा उजळल्या. आपण हे पुस्तक वाचले नसेल तर जरूर वाचावे आणि एका अनोख्या प्रवासाचे साक्षीदार व्हावे.



## आनंदी पहाट

### नोकरीची स्पर्धात्मकता दृष्टिकोन बदलतात

आधुनिक केसरी

एकदा तुम्हाला तुमच्या करिअरची उद्दिष्टे आणि तुम्हाला कोणत्या प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये स्वारस्य आहे; याची चांगली कल्पना आली, की तुमचे अनुभव या भूमिकांमध्ये कसे उपयुक्त ठरू शकतात याचा विचार करा. तुमची हस्तांतरणीय कौशल्ये ओळखा, ज्यात तुम्ही तुमच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात संपादन केलेली तांत्रिक कौशल्ये आणि कामाच्या ठिकाणी कौशल्ये यांचा समावेश आहे. जर तुम्ही तुमची पहिली नोकरी शोधत असाल, तर तुमची हस्तांतरणीय कौशल्ये अभ्यासक्रमाबाहेरील क्रियाकलाप, स्वयंसेवक म्हणून काम करून दैनंदिन जीवनात आनंद देऊ शकतात. तुम्ही प्रवेश परीक्षेस बसण्याचा विचार करत असल्यास आणि तुम्ही पात्र असलेल्या कोणत्याही नोकरीसाठी अर्ज करण्याचा प्रयत्न करत असल्यास, तुमच्या करिअरच्या आशा आणि स्वप्नांचे आकलन करण्यासाठी वेळ काढणे हा नोकरी शोध सुरू करण्याचा अधिक समाधानकारक आणि फलदायी मार्ग असू शकतो. नोकरी मिळवण्याचे अनेक मार्ग आहेत. तुम्ही कोणत्या प्रकारची नोकरी करत आहात हे सर्वस्व उद्योग आणि नोकरीची स्पर्धात्मकता यावर अवलंबून असते त्याप्रमाणे दृष्टिकोन बदलू शकतात. काहींना त्यांच्या नोकरीच्या शोधात नेटवर्किंग आणि वैयक्तिक परस्पर संबंध प्रभावी वाटू शकतात, परंतु बरेच लोक नोकरीचा अर्ज करण्यासाठी आणि मुलाखत घेण्याच्या पारंपारिक दृष्टिकोनावर अवलंबून असतात. ही प्रक्रिया त्रासदायक असू शकते, परंतु या धोरणांमुळे तुमचा प्रवास सुरू होताना तुम्हाला स्पष्टता आणि आत्मविश्वास मिळू शकतो. तुम्हाला सक्षम बनवण्याचा विचार केल्याने, तुम्हाला विशिष्ट भूमिका आणि करिअर टार्गेट करण्यासाठी तुमचा शोध कमी करण्यात काही बाबतीत मदत होऊ शकते. तुम्हाला कोणत्या प्रकारच्या उद्योगांचा किंवा भूमिकांचा अनुभव आहे किंवा तुम्हाला कशात स्वारस्य आहे; त्याबद्दल विचार करणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### मोक्षानंदी भिक्षा | प्राप्त झाली ||

मंद तेजाळला | नंदादीप जेथे ||
ज्ञान विद्या तेथे | सुखावले ||१||
श्रध्दा भक्ती भाव | नांदावा अखंड ||
जळावा पाखंड | क्षणोक्षणी ||२||
चालता बोलता | विठुचे स्मरण ||
संतांचे चरण | दिसे आम्हा ||३||
गाथा ज्ञानेश्वरी | घराचे भूषण ||
सात्त्विक तोरण | शोभे दारी ||४||
तुळशीची काया | फुलली अंगणी ||
दर्वळ चंदनी | अभंगात ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## सत्संगतीचे दोन प्रकार

आधुनिक केसरी

सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. संतांची संगत दोन प्रकारे होऊ शकते. एक, संतांच्या देहाची; दुसरी, संतांनी सांगितलेले साधन करीत राहण्याची. यांपैकी पहिली, म्हणजे संताच्या देहाची संगती लाभणे फार कठीण आणि दुर्मिळ. कारण संत जरी खरा असला तरी त्याला ओळखणे कठीण असते, आणि पुष्कळदा त्याच्या बाह्य वागणुकीवरून मनात विकल्प येण्याचा संभव असतो; आणि एखाद्या भोंदूशीच गाठ पडली तर त्याच्या संगतीपासून नुकसान हे ठरलेलेच. म्हणून पहिला, म्हणजे संताच्या देहाच्या संगतीचा मार्ग, हा पुष्कळदा धोक्याचा ठरण्याचा संभव असतो. दुसऱ्या मार्गाने जाण्यात, म्हणजे त्याने सांगितलेले साधन करण्यात, बिलकूल धोका नसतो; कारण खरा संत काय किंवा भोंदू साधू काय, कोणीही झाला तरी तो दुसऱ्याला सांगताना खरे आणि बरोबर असेल तेच सांगेल. तो भोंदू असला तरी, आपला भोंदूपणा लपविण्याकरिता, जे बरोबर असेल तेच सांगणे त्याला जरूर असते. साधकाने



शुद्ध भावनेने ते साधन केले की सत्संगतीचा फायदा मिळून त्याचे काम होते. खऱ्या संताच्या देहाच्या संगतीचा लाभ जर दैववशात् प्राप्त झाला तर मात्र काम बेमालूम होते. ज्या वाहनाचा आपण आश्रय करतो त्या वाहनाचा वेग हा आपला वेग होतो; फक्त त्या वाहनात निश्चल बसून राहणे एवढेच आपले काम असते. तसे आपण खऱ्या संताजवळ नुसते पडून राहावे. संताच्या संगतीत आपली कृती अशी काहीच नसते, नुसते अस्तित्व असते. त्यामुळे अहंकाराला वाव न राहून वासनेचा क्षय व्हायला फार मदत होते. तुकाराम महाराजांनी देवाजवळ धनसंपदा मागितली नाही, मुक्तीदेखील नको असे म्हटले, फक्त संतसंगती दे असे म्हटले.
संतसंगाने नाम घेण्याची बुद्धी येते. बुद्धीची स्थिरता ठेवणे हे फक्त नामानेच साधेल. नाम जरूर तेवढे ठेवते आणि बाकीचे नष्ट करून टाकते. पण अनन्यभावाने नाम घ्यावे. नाम घेता घेता बुद्धीला स्थिरता येते; आणि मग मनात विकल्प न येता संतांच्या देहाच्या संगतीचा खरा फायदा घेता येतो. सत्संगतीत कष्टाशिवाय ईश्वरप्राप्ती होते. संतसंगतीत साधने आपोआप होत असतात. त्यांच्या पूजनाबरोबर पूजन, भजनाबरोबर भजन, श्रवणाबरोबर श्रवण, स्मरणाबरोबर स्मरण आपोआप होते. सत्संगतीत स्वतःची विस्मृती होते आणि नामस्मरण घडते. म्हणून प्रयत्नाने संतसंगती करावी. तिथे प्रारब्ध आणू नये. सत्संगतीत राहून नाम घेतले तर देहबुद्धीच्या कोंडीतून बाहेर पडता येते. ९३. संतांना जे आवडते ते आपल्याला आवडणे म्हणजे त्यांचा समागम करणे होय.

## हितगुज



पुष्प ४१वे



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)


### माणूस नावाचे मशीन

फक्त भौतिक गरजा व ऐहिक सुखांच्या मागे धावायचे, त्यासाठी वाटेल त्या मार्गाने स्पर्धेत जिंकायचे, यश मिळवायचे, दैन्य, दुःखे, दारिद्र्य, हलाखी, करून आक्रोश, निराधारता, अन्याय, शोषण, क्रूरता, अमानवीयता सर्वांकडे पाठ फिरवून सुखांचा उपभोग घेत जगायचे, अशा जीवनधारणेला स्वीकारणारा समाज फक्त 'माणूस' नावांच्या मशीन्सने बनलेला, स्वार्थी किटक प्रवृत्तींचा समाज असतो. खरेज, अशी माणसे सुखी, संतुष्ट व तृप्त असतात? खरेच त्यांना आपले जगणे योग्य, सार्थक वाटते? या जगात सुखी कोणी ही नाही मग मने बोथट करून मृगजळामागे का धावत असतात? सर्वजण? जगण्याचा प्रत्येक क्षण 'माणूस' म्हणून जगता यावा, माणूस म्हणून लाभलेल्या सर्व शक्तींचा कौशल्यांचा आविष्कार करता यावा, प्रत्येक क्षण हा सुंदर व आनंददायी बनावा, प्रत्येक क्षण आपुलकी, स्नेहाने भिजलेला सुखावणारा असावा, ही प्रत्येकाची मनापासूनची इच्छा असते. त्यासाठी साहित्य मदत करते. त्यासाठी संतकाव्य सोबत करते. मनाला जागवण्याचे, माणूसपण घडवण्याचे, मनाला फुलवण्याचे, बुद्धीला विवेकी बनवण्याचे कार्य चिरंतन, मूल्यदर्शी साहित्य करते. मनाच्या निर्वैयक्तिक, विशालतेतून, सामाजिक बांधिलकीतून कळवळ्याच्या नात्यातून साहित्याची निर्मिती होत असते. संतांचे साहित्य याबरोबर ईश्वर साक्षात्काराच्या स्वानुभूतीतून शब्दरूप धारण करते. माणसाला 'माणूस' म्हणून जगता यावे, यासाठी अशा संत साहित्याचा संस्कार मनाला होणे ही सार्वकालीन, वैश्विक गरज आहे. अशा संस्कारक्षम पिढ्या राष्ट्र उभारणी करतात, आदर्शांतून, त्यागातून सुंदर इतिहास घडवतात, अशा पिढ्या अध्यात्माचा दीपक तेवत ठेवतात; अशा पिढ्या सुंदर, चिरंतन कला आविष्कार करतात. म्हणून संवेदनांना धार मिळेल असे शिक्षण व पर्यावरण सतत असले पाहिजे.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जीवन्मुक्त जग में रहे,
गन्ध जगत नहिं आय ।
यह महिमा निःशब्द की, दुर्लभ जीवन
पाय ।।६३।।(स्वर्वेद पंचम मण्डल
एकादश अध्याय) ०५/११/६३
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जीवन्मुक्त योगी या संसार-जगतात राहतो पण संसार-जगताचा प्रभाव त्याच्यावर पडत नाही. हा महिमा परम पुरुषाचा आहे, ज्याच्या प्राप्त होण्याने योग्याला ही दुर्लभ अवस्था प्राप्त होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी

ऋग्वेदात एक मंत्र आहे "हिरण्यगर्भःसमवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत्अ र्थ-- विश्व निर्माण होण्यापूर्वी हिरण्यगर्भ एकटाचं होता. तोंचं सगळ्या विश्वाचा स्वामी होता. मांडूक्य उपनिषदात सांगितले आहे की "ओ इति एतद् अक्षरं इदं सर्वम्" अर्थ--- ओं (ओंकार)हे अक्षर हे सर्व विश्व आहे. त्यालाच समर्थांनी *विश्व मन* हे नाव दिले आहे. हे विश्व नामरूपाने भरलेले आहे. प्रत्येक वस्तूला नाम व रूप हे दोन अंगे आहेत. रूप हे बहिरंग आहे तर ते पंचमहाभूतांचे बनलेले आहे. ते कायम स्थूल रूपात विराजमान झालेले आहे. पण नामरूपात बदल होत नाही.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## निरूपण

आधुनिक केसरी

सीतें वोठ तरकती । हात पाव टांका फुटती ।
चिखल्या जिव्हाळ्या लागती । या नांव आदिभूतिक ॥ २२॥
अशनपानाचिये वेळे । उष्ण रसें जिव्हा पोळे ।
दांत कस्करे आणी हरळे । या नांव आदिभूतिक ॥ २३॥
पराधेन बाळपणीं । कुशब्दमारजाचणी ।
अन्नवस्त्रेंवीण आळणी । या नांव आदिभूतिक ॥ २४॥

बुधवार, १७ एप्रिल २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २३१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक



●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 17 APRIL 2024 adhunikkesari.com ●YEAR-03 ●ISSUE-231 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


# विकासपुरुषाने चंद्रपूरचा काय विकास केला

## विजय वडेट्टीवार : प्रतिभाताई खासदार होत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर : देशात मोदी लाट असताना बाळू धानोरकर यांना लोकसभा निवडणुकीत निवडून आणले होते. आता लाट नाही त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या उमेदवार प्रतिभाताई धानोरकर मोठ्या मताधिक्याने निवडून येणार, असा विश्वास विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर प्रतिभाताई खासदार होत नाहीत तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही, असा संकल्प करत विकास पुरुषाने चंद्रपूरचा काय विकास केला, असा सवाल वडेट्टीवार यांनी विरोधकांना केला.**



मूल इथे इंडिया आघाडीच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर यांच्यासाठी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि काँग्रेसचे विधीमंडळ नेते बाळासाहेब थोरात याची प्रचारसभा झाली. या प्रचार सभेत दोन्ही नेत्यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला.

वडेट्टीवार म्हणाले कि, भाजप विरोधात लाट आहे. त्यामुळे भाजपवाले मुळासकट उखडून पडतील. फक्त एक धक्का द्या आणि मोदी मुक्त भारत करा. हे जुमलेबाज सरकार आहे. या सरकारचे मुखिया सकाळीं उठल्यापासून खोटं बोलायला सुरुवात करतात. मणिपूरमध्ये महिला शोषण झाले. महिलांची अब्रू लुटली. नग्न करून महिलांची धिंड काढली. तेव्हा देशाचे पंतप्रधान कुठे होते? आदिवासी महिलांचे शोषण होत असताना पंतप्रधानांना झोप कशी लागते? असा सवाल देखील वडेट्टीवार यांनी केला. दोन मुख्यमंत्री तुरुंगात गेले. काल राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांचे हेलिकॉप्टर चेक केले. मग भाजपच्या नेत्यांची तपासणी का होत नाही, असा सवाल श्री. वडेट्टीवार यांनी केला. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण भाजपात गेले,काल परवा माझ्याबद्दल पण अफवा पसरवली. पण लक्षात ठेवा बाबासाहेब म्हणाले होते १०० दिवस शेळीसारखं जगण्यापेक्षा एक दिवस वाघ म्हणून जागा. मी वाघ आहे असे वडेट्टीवार यांनी ठणकावून सांगितले. केंद्रीय यंत्रणांचा धाक दाखवून आमदार फोडले. उद्या सत्ता बदलली तर सुरुवात चंद्रपूर पासून होईल. आम्हाला कसला धाक दाखवताय. अनेकदा ऑफर येतात पण मी भीक घालत नाही. किती महिने आत ठेवलं तरी मी मी घाबरत नाही. आम्ही प्रतिभाताई धानोरकार यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. लोकशाही, संविधान वाचवण्यासाठी प्रतिभाताई यांना तुम्ही निवडून द्या, असे आवाहन राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले.

काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, प्रत्येक घरात भांड्याला भांड लागते. पण घरावर वेळ येते तेव्हा कुटुंब एकत्र येत असत. संकट बाहेरून येत तेव्हा कुटुंबाला एकत्र येऊन लढायचे असते त्यामुळे विजय वडेट्टीवार आणि त्यांची टीम काम करते हे महत्वाचे आहे, असे बाळासाहेब थोरात म्हणाले.सगळं विसरून ते प्रतिभाताईंना निवडून आणण्यासाठी कामाला लागले आहेत. दिवंगत खासदार बाळू धानोरकर काम करणारा माणूस,पण अकाली त्यांचे निधन झाले, प्रतिभा धानोरकर यांच्यावर आकाश कोसळले तरी ताई लढायला उभ्या राहिल्या, ताईचं कौतुक करावं तेवढं थोडं आहे.प्रतिभा धानोरकर आदर्श खासदार म्हणून काम करतील. ताईंना प्रचंड मतांनी निवडून द्या, असं आवाहन विधीमंडळ नेते बाळासाहेब थोरात यांनी यावेळी केले. सभेत मंचावर राज्याचे विधीमंडळ नेते बाळासाहेब थोरात, काँग्रेसचे सचिव आशीष दुआ, जिल्हाध्यक्ष आ. सुभाष धोटे, जिल्हा प्रभारी पठाण,रा. काँ. जिल्हाध्यक्ष (शरद पवार गट) राजेंद्र वैद्य, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अध्यक्ष संतोष सिंह रावत, माजी आ. देवराव भांडेकर, प्रकाश पाटील मारकवार, महीला आघाडी जिल्हाध्यक्ष नम्रता ठेमस्कर, डॉ. विश्वास झाडे, राजू झोडे, राकेश रत्नावार, घनश्याम येनुरकर व महाविकास आघाडीचे व घटक पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर धुळे तालुका पोलिसांनी गुटखा तस्करी रोखली

## 10 लाख 62 हजार 874 रुपयांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हयाच्या सिमावर्ती तपासणी नाक्यावर धुळे तालुका पोलिसांनी अवैधरित्या गुटखा तस्करी रोखून कारवाई केली आहे. गुटख्याची होणारी वाहतूक आणि विक्री करण्यासाठी होणारे प्रयत्न तालुका पोलिसांनी हाणून पाडले आहे.या कारवाई मध्ये ट्रक वाहनासह प्रतिबंधित गुटखा असा एकूण 10 लाख 62 हजार 874 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हयात येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांना गुप्त माहिती मिळाली की, सुरत येथून ट्रक क्रमांक-MH-43-E-2169 मध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला विमल पान मसाला व सुगंधीत तंबाकूचा माल भरुन कुसुंबा मार्गे मालेगांव कडे जात आहे. त्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली व सुचनेप्रमाणे पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस हेडकॉन्स्टेबल कुणाल पानपाटील, पोलीस कॉन्स्टेबल विशाल पाटील,कुणाल शिंगाणे, धिरज सांगळे, रविंद्र राजपूत अशांनी तात्काळ कुसुंबा ते मालेगांव रोडवरील सिमावर्ती तपासणी नाक्यावर व अजनाळे गावाच्या शिवारात सापळा रचला. त्यानुसार ट्रक येताच पथकाने वाहनाला थांबवून चौकशी केली असता त्यात चालक वाहीद आरीफ पिंजारी राहणार मालेगांव जिल्हा नाशिक व क्लिनर शोएब खान मुजीब खान राहणार मालेगांव जिल्हा नाशिक यांना विचारपूस करता त्यांनी सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली परंतू बातमीची खात्री करण्यासाठी पोलीस तपासणी पथकाने सोबतच्या पंचांसमक्ष वाहनाची कसून तपासणी केली असता ट्रक मध्ये साडया व इतर गारमेंट मालाचे आडोशला विमल पान मसाला व सुगंधीत तंबाकूचा माल मिळून आला. सदर या कारवाईत 10 लाख 62 हजार 874 रुपये किमतीचा मुद्देमाल तालुका पोलिसांनी जप्त केला. सदर याबाबत तालुका पोलिसात गुन्हा दाखल झाला असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे करीत आहेत.


# खेकड्यांची नांगी आपल्यालापण ठेचता येते

## आदित्य ठाकरे यांचा तानाजी सावंतांवर निशाणा

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** महायुतीचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांनी आज शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे, आमदार रोहित पवार उपस्थित होते. यावेळी आयोजित रॅलीला संबोधित करताना आदित्य ठाकरे यांनी भाजपा आणि शिवसेना शिंदे गटावर टीका केली. तसेच धाराशिवचे पालकमंत्री तथा आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्यावर नाव न घेता त्यांनी निशाणा साधला. आदित्य ठाकरे म्हणाले, खेकड्यांवरही बोलणार, सोडणार नाही. जो जो वाकडा जाईल, त्याच्यावरही बोलणार, खेकड्यांची नांगी आपल्यालापण ठेचता येते", असे आदित्य ठाकरे म्हणाले. शेतकरी म्हणून आज तुम्ही खुश आहात का? या दोन वर्षात तुमच्या शेतीमालाला भाव मिळाला का? जेव्हा अवकाळी पाऊस, गारपीट झाली तेव्हा नुकसान भरपाई मिळाली का? या सरकारकडून मदत मिळाली का? केंद्र सरकारकडून मदत मिळाली का? नाही मिळाली. मग जेव्हा महाविकास आघाडीचे सरकार होते, तेव्हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना कर्जमाफी मिळाली होती. त्यामुळे महाविकास आघाडीच्या मागे उभे राहा, असे आदित्य ठाकरे म्हणाले. आज अनेक उमेदवारांचे अर्ज भरायचे सुरु आहेत. पण ओमदादा जिगर का तुकडा आहेत. त्यामुळे मी या ठिकाणी आलो. आपल्याला पुन्हा एकदा हक्काचे सरकार आणायचे असेल केंद्र सरकारमध्ये पुन्हा आपल्या हक्काचा माणूस म्हणून ओमराजे निंबाळकर यांना दिल्लीला पाठवायचे आहे. गद्दार विरुद्ध निष्ठावंत अशी ही लढाई आहे", असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी विरोधकांवर घणाघात केला. शेतकऱ्यांना आपण अन्नदाता समजतो. मग केंद्र सरकारने दिल्लीत शेतकऱ्यांच्या रस्त्यावर खिळे ठोकून ठेवले. लाठी चार्ज केला, मग हे सरकार तुमचे आमचे असू शकते का? आज या देशात शेतकरी हैराण आहे. गॅसच्या किंमती वाढल्या आहेत, अशा अनेक मुद्यांवरुन आदित्य ठाकरे यांनी भाजपा सरकारवर टीका केली.




॥ श्री ॥
॥ श्रद्धा - सबुरी॥
आमंत्रण
श्रीराम नवमी निमित्त
महाप्रसादाचा कार्यक्रम
आयोजित करण्यात आला आहे.
दि. १७ एप्रिल २०२४ रोजी दुपारी १२.३० ते ५.०० वाजेपर्यंत
करण्याचे योजिले आहे तरी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.
आयोजक
संदिप शिवन्ना घंटे 7249417316
निलेश परकेल्लू 9881166773
व समस्त मित्र परिवार
स्थळ : साईबाबा मंदिर (साई फार्म हाऊस)
गट नं. ५५, कृष्णापुरवाडी, हर्सूल सावंगी रोड, छत्रपती संभाजीनगर.

# उद्धव ठाकरेंचा विश्वास

आधुनिक केसरी

मशालीच्या तेजाने जुमलेबाजी आणि भ्रष्ट राजवट जळून खाक होईल याची मला खात्री आहे. पोटनिवडणुकीत मशालीचा विजय झाला आहेच. आता मशाल घेऊन जात असताना नवे चिन्ह घेऊन जा, असे उद्धव ठाकरेंनी सांगितले. मशाल या चिन्हाचे अनावरण करण्यात आले तसेच शिवसेनेचे गीतही लॉंच करण्यात आलं त्यावेळी उद्धव ठाकरेंनी हे वक्तव्य केले आहे. महाविकास आघाडीच्या संयुक्त सभा होतील. जाहीरनामा किंवा वचननामा जो म्हणतात तो देखील आम्ही आणणार आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी मुस्लीम लिग वगैरे काहीही म्हणू शकतात कारण जनसंघाचे संस्थापक शामाप्रसाद मुखर्जींनी मुस्लिम लिगशी युती केली होती. कॉंग्रेस तेव्हा स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेला पक्ष होता मोदींना ते माहीत आहे त्यामुळे त्यांच्या आठवणी जाग्या झाल्या असतील असाही टोला उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे. मोदी मिडल इस्टला जाऊन मशिदीत गेले होते, मोहन भागवत यांनी मुस्लिमांना जाऊन भेट घेतली होती त्याचा अर्थ काय होतो? सर्वोच्च न्यायालयात निवडणूक रोख्यांचे बिंग फुटले. तसेच परकला म्हणून जे आहेत त्यांनी तर या प्रकरणाला मोदीगेट नाव दिले होते. हा सर्वात मोठा घोटाळा आहे. असा आरोप पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंनी केला आहे. मोदी आणि अमित शाह यांना दोन महिने फिरु द्या. दहा वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी काय काय केले नाही ते पाहुद्या, लोकांचे म्हणणे ऐकू द्या. त्यांच्याकडे आता दोनच महिने उरले आहेत. त्यानंतर चित्र बदलेलं असेल असंही उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे. लोकसभेची लढाई ही लोकशाही विरुद्ध हुकूमशाही अशी आहे. आम्ही महाराष्ट्रात ४८ जागा जिंकू. ४५+ हा भाजपाचा देशातला आकडा आहे. आम्ही महाराष्ट्रात आम्ही ४८ जागा जिंकू असे सांगत उद्धव ठाकरेंनी टोला लगावला आहे. धूळ गोळा करणारा व्हॅक्युम क्लिनर असतो तसी भाजपा हा पक्षही भ्रष्टाचारी गोळा फिरतो आहे. असंही उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे.



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

# राममंदिर झाले, रामराज्याचे काय ?

आधुनिक केसरी

**बोलणे सोपे, तोलणे अवघड! परवा परवाला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती झाली आणि आज लगेच रामनवमी! आज मिडीयावर, वर्तमानपत्रात, गावोगावी, शहरात, गल्लोगल्ली, सर्वच मंदिरात सर्वत्र श्री रामाच्या नावाचा जयघोष होतोय! श्री रामचंद्र नावाचा मनुष्य असलेला एक युवक, आपल्या सद्गुणांच्या बळावर जसे संयम, शांती, धैर्य, लोकभावनेचा आदर आणि हे करतांना झालेल्या काही चुकांना स्वतःच्या प्राक्तनात बांधून एक लोकमान्य राजा झाला! भारतवर्षात अनेक महान सुपुत्रांपैकी राजा श्रीरामचंद्र एक आदर्श सुपुत्र! त्यांचा जन्म दिवस निश्चितच आपल्यासाठी गौरवपूर्ण, अभिमान आणि आत्मसंयमाचा दिवस!**

आज त्यानिमित्ताने आदर्श राजा श्रीरामचंद्र यांच्या भजन-कीर्तन, महाप्रसाद, नटणे-थटने, मिरवणुका, रंगांचे सादरीकरण मोठ्या जल्लोषात होत आहे! भारतीय माणूस मुळातच उत्सवप्रिय! एखादा उत्सव साजरा करतांना काल-आज-उद्या याचे कुणालाच भान नसते. आपण काय करत आहोत? हे केल्यानंतर याचे परिणाम काय होतील? आपल्या जीवनात याचा परिणाम-परिपाक काय? याचे फलित काय? कुणीही हा विचार करायला तयार नाही. विशेषतः हा सगळा जल्लोष साजरा करणारा युवा वर्ग! आज युवा वर्गाची अवस्था काय आहे? हा प्रश्नच विचारणे महापाप होऊ शकत! नीट, संयमाने, शांततेने वागा, पुस्तक वाचा, मोठ्यांचा सन्मान करा असे साधे साधे वाक्य सुद्धा युवकांना तीक्ष्ण बाणासारखे टोचत आहेत. युवकांमध्ये तीन 'त' कार जसे तपस्विता, तेजस्विता आणि तत्परता हे तीनही गुण दुर्मिळ झाले आहेत! क्षमा करा सज्जनहो! पण हे सर्वांचेच झाले आहे असे नाही, परंतु प्रमाण मात्र प्रचंड वाढले आहे! मित्रहो, एका महामानवांची, आदर्श राजाची किंवा समाजसुधारकाची जयंती-मयंती साजरी करतांना केवळ आणि केवळ जल्लोष होणे अपेक्षित आहे का? मी मागील अनेक दिवसांपासून अनेक लेख लिहितो आहे, अनेक व्याख्यान, कीर्तनातून बोललो आहे. माझा लेख वाचून मला आत्तापर्यंत मिडियावरील काही लाईक, कमेंट सोडल्या तर अजून एकाही तरुणाची प्रतिक्रिया आली नाही. मला चाळीशी ओलांडलेले आणि शक्यतो सेवानिवृत्त झालेल्या लोकांचे कॉल्स येतात. कदाचित आम्ही सगळेच हतबल झालो आहेत म्हणून एकमेकांना केवळ सांत्वन तर देत नाही? असाही एखादा विचार मनातून निघून जातो. आज रामनवमी निमित्ताने अनेक अभंग, कविता आपल्याला वाचायला मिळतील. त्यातील जगद्गुरू संत तुकारामांच्या "राम म्हणता रामचि होईजे। पदी बैसोन पदवी घेईजे।" ह्या ओळी जास्तच अंतर्मुख करून गेल्या. त्यामुळेच तर संत तुकारामांच्या अभंगाचे प्रश्नार्थक शीर्षक! तुकारामांनी आणि त्यांच्या अगोदरच्या अनेकांनी राम जन्माचा जल्लोष करण्यापेक्षा माणसाने जोशात आपला होश न गमावता प्रत्येकाने राम होणे अत्यंत गरजेचे आहे! अयोध्येत राम मंदिर उभे राहिले आहे. त्याचा जल्लोष ओसरला आहे. केवळ पुतळे, मंदिरे अथवा जयंती-पुण्यतिथी साजरी करतांना एवढ्यावरच थांबून कसे चालेल? एकीकडे आपण लोकशाहीच्या शंबरीकडे वाटचाल करतांना आपल्यासमोरील प्रश्न संपलेले नाहीत. मंदिराच्या उभारणीने भारतीयांची जबाबदारी वाढली आहे. जगात भारत हा महापुरुषांची खाण आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. आपला इतिहास



मोठा उज्वल आणि विस्मयकारी आहे. अनेकांनी आपल्या कर्तृत्वाने अटकेपार झेंडे रोवतांना देशाचा गौरव देदीप्यमान केला आहे. त्यात पुरुषोत्तम श्रीरामचंद्र यांचे नाव अग्रक्रमाणे घेतले जाते. त्याचबरोबर आज आपल्याला आपल्यातीलच रावण दहन करण्याची वेळ आली आहे! आपल्यातील पंच ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यावर नियंत्रण ठेवून आपल्यातील अकराव्या मनाने या दहा इंद्रियरुपी रावणावर विजय मिळविण्याचा दिवस म्हणजे दसरा! या दहांना हरवून आपल्याला नियंत्रणात रहायचे आहे! असे झाल्यासच खऱ्या अर्थाने आपल्यातील रावण जळणार आहे! तो जाळण्यासाठी आपल्याला भावाभावात राम-लक्ष्मणाचे प्रेम वृद्धिंगत करावे लागेल. त्याचबरोबर आपल्याला अनेक दुर्गुणांचे सिमोल्लंघन करावे लागेल! व्यसनमुक्तीचे सिमोल्लंघन! दारूमुक्तीचे सिमोल्लंघन! कट्टरता, भेदभाव, द्वेष, मत्सर इत्यादीचे सिमोल्लंघन करावे लागेल! दिवसेंदिवस माणूस संकुचित होत असून विविध गोष्टींचे प्रदर्शन करण्याचा कालखंड आला आहे. आज माणसं बोलतांना दिसत आहेत, मात्र त्यांचे आचरण शुद्ध राहिले नाही. आपल्या भोवताल आणि घराघरात रावणरुपी अनंत समस्या आणि रोग ठाण मांडून बसले आहेत. माणसांचा संवाद संपत चालला आहे. ही सगळी बदलेली परिस्थिती पाहून कवी व्यथित होऊन या बोलक्या आणि ओळी लिहतोय,

**असा महिमा या कलीचा, आता मी जावू कुठे ? इथे घराघरांत रावण, एवढे राम भेटतील कुठे ?** काळ झपाट्याने कूस बदलतो आहे. एक भाऊ वनवासाला निघाल्यानंतर दुसरा भाऊ कोणताही विचार न करता त्याच्या संरक्षणासाठी जाणारा लक्ष्मण कुठे? आणि आज मटणाचा रस्सा दिला नाही म्हणून भावाच्या डोक्यात खलबत्ता घालून जीव घेणारा भाऊ कुठे? आपल्या सावत्र आईने वनवासाला जाण्याची आज्ञा पालन करणारा सुपुत्र राम कुठे आणि दारूसाठी पैसे दिले नाही म्हणून आपल्याच जन्मदात्रीचा धारदार चाकूने खून करणारा आजचा कुपुत्र कुठे? अशी एक ना अनेक उदाहरणे आज आपल्या भोवताल घडत आहेत. घराघरांत वाढणारी रावणवृत्ती ही येणाऱ्या काळासाठी मोठी धोक्याची घंटा आहे. आज तरुण पिढीला मोबाईल आणि व्यसनांनी विळखा घातला आहे. महाविद्यालयात उच्चशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे वर्तन विचित्र झाले आहे. मुलांचे उपस्थितीचे प्रमाण कमालीचे घटले आहे! जर ही मुलं वर्गात येऊन बसलीच नाही तर यांच्यावर संस्कार होणार कसे? ही पिढी प्रज्ञावंत, गुणवंत, ज्ञानवंत होणार कशी? या पिढीत शांती, संयम, सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता, देशप्रेम, मूल्यशिक्षण इत्यादी संस्कार रुजणार कसे आणि कुठे? आणि जर हे झालेच नाही तर आपल्या देशाचे भविष्य व्यसनी-दारुड्या-अशिक्षित-अज्ञानी तरुणांच्या हाती जाणार का? अशी अनामिक भीती माझ्यासारख्या पापभिरू, शिक्षक माणसाला वाटणे गैर काय? आज घराघरात भाऊ राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न आणि कौशल्या-दशरथ सारख्या आई बापांची गरज आहे. परंतु आज घराघरांत कैकयी आणि मंथरा सारख्या प्रवृत्ती वाढल्या तर पुन्हा राम वनवासाला जाणार का? **कुठे बाप दशरथ अन कुठे माता कौशल्या ? वाढताहेत मंथरा अन कैकयी जिथे तिथे सांग भरता, करू काय अन जाऊ कुठे ? इथे घराघरांत रावण, एवढे राम भेटतील कुठे ?**

आज ह्या सर्वच प्रवृतीचे दहन करून आपल्याला रामासारखा मातृपितृभक्त आणि लक्ष्मणासारखा बंधुप्रेमी भाऊ घराघरांत निर्माण करण्यासाठी इथे व्यसनं आणि दुर्गुणांचा त्याग क्सरून सद्गुणांची कास धरावी लागेल! चला तर मग, दुर्गुणांना जीवनातून हद्दपार करून सद्गुणांची कास धरूया, उद्याच्या सकारात्मक बदलाची कास धरूया! रामाचा 'सर्वे सुखिनो भवन्तु सर्वे सन्तु निरामयः' आणि सम्राट अशोकाने घालून दिलेला 'पंचशील-बुद्धधम्म' या मार्गांनी शांतता-संयम-प्रज्ञा-शिल-करुणा-बंधुता-देशप्रेम या महत्वपूर्ण बाबींचे प्रकर्षाने जीवनात पालन करूया! खऱ्या अर्थाने आपला भारत देश समृद्ध-संपन्न-स्वावलंबी बनवूया! जय श्रीराम!



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# आदर्श जीवनाचा मार्ग प्रभू श्रीरामांचे जीवनचरित्र

आधुनिक केसरी

**निती न्याय धर्म, सदाचार,आणि संस्कार हाच यशस्वी जीवनाचा उत्तम मार्ग आहे.मानवी जीवन हे संस्कारांची खाणं आहे हि शिकवण जगासाठी अलिखित आचारसंहिता म्हणून पथ मार्ग निर्माण करणारे जगद वंदय सृष्टी चे पालक भगवान प्रभु श्रीराम यांचा जन्म आजच्या दिवशी झाला. प्रभु श्रीराम यांच्या जीवनाशी निगडित प्रत्येक प्रसंग हे मानवतेचा न्यायचा, नितीच संस्कारांचा धर्माचा, आणि शौर्याचे दर्शन घडवणारा आहे.अगदी बाल वयात राजपुत्र असताना देखील वनात गुरू विश्वामित्र ऋषी यांच्या आश्रमात जाऊन झोपडीत राहुन गवतावर विश्राम करत फळ कंदमुळे सेवण करून राजेपणाचा कोणाताही बडेजाव न करता शिक्षण घेतलं.**

हा किती मोठेपणा आहे आपल्याकडं थोडी संपत्ती जरी असली तरी देखील आपण कसं वागतो आणि जगाचा राजा सगळ्यात मोठं राज्य असणार्या अयोध्यचे राजपुत्र राम यांचं अनुकरणीय अचरण वंदनीय आहे. उद्या अयोध्येचे राजे म्हणुन राज्य अभिषेक होणार तरी आनंद नाही आणि संध्याकाळी समजलं राज्य अभिषेक रद्द होऊन वाट्याला चौदा वर्षे वनवास आला आहे तरी दुःख नाही. बंधु लक्ष्मण वडीलांवर चिडला तर त्याला धर्म समाजावला आणि शांत केले व तातडीने विलंब न करता वनवासात निघाले. वनवासाला जाताना शरयु नदी पार करत असताना नावेतुन पैलतीर जात असताना त्या नाविकाला दिलेली मुदरीक असो कि चित्रकुट पर्वातावर पोहचल्यावर जेव्हा वनदेवी ने स्वागत केले आणि विचारले कि हे प्रभु मी आपली काय सेवा करू तेव्हा प्रभु श्रीराम यांनी अदभूत उतर दिलं ते म्हणजे मी ज्या रस्त्याने आलो आहे त्या रस्त्यावर असणारे काटे काढून टाकावे हे ऐकुन वनदेवी अचंभित झाली आणि वनदेवतेने पुन्हा प्रश्न केला प्रभु आपणं तर आलात मग काटे कशासाठी हटवु तेव्हा प्रभु श्रीराम म्हटले मला शोधत माझा लहान बंधू भरत येईल त्याच्या पायात काटे मोडता कामा नये.हे ऐकुन वनदेवी स्तब्ध झाली.राजे दथरथ यांच्या निधनानंतर भेटीसाठी आलेली सर्व प्रजा बंधु भरत आणि सर्व माता आल्या असता सर्व प्रथम माता कयकयिचे दर्शन घेतलं म्हणजे माता कायकयिला वाईट वाटु नये हाच भाव त्या मागे होता.भरत आणि संपूर्ण अयोध्या वाशी यांनी राजे दथरथ ह्यात नसल्याने आता वनवास त्यातुन परत चालावा हि विनंती केल्यावर सगळ्यांना निती धर्म शिकवला आणि सर्वांना अयोध्येला परत जाण्यासाठी आदरपूर्वक सांगितले.तदनंतर शबरीची उष्टी बोरे खाण असो कि पक्षीराज जटायू चा विधीवत अंत्य विधी केला.रा वणाच्या विरूद्ध लढाई साठी प्रभु श्रीराम हे अयोध्येच सैन्य अथवा आजुबाजुला असणारा मामाच राज्य कौशल प्रदेश तसेच राजा जनक यांच्या पैकी कोणाचही सैन्य सोबत घेऊ शकले असते अथवा किंसकिदा राज्याचा राजा वाली ज्याने रावण बगलेत धरून आणला होता त्याची मदत घेऊन रावणाला परास्त केले असते पण असं न करता सुग्रीव जो वंचित होता त्याचा राज्यभिषेक करुन वनर राज वालिचा वध केला.वालिने शरण येऊन वधाचे कारण विचारले असता त्याला राजा बळीची कन्या,इंदपुञी बहीन विद्युत ज्वला  आणि पुत्र वधु सांधनी बदल कसा दृष्टीकोना बदल त्याची पाप आठवण करून दिली तेव्हा वालीने चुक मान्य करुन आपला पुत्र सुग्रीव याला प्रभु श्रीराम यांच्या स्वाधिन केले. महाबली हनुमान यांच्या मध्ये असणारी शक्ति व बुद्धी याचा योग्य उपयोग करत समुद्रावर सेतू निर्माण करत.राजा म्हणून रावणाला शरण येण्याची योग्य संधी दिली. शिष्टाई करण्यासाठी आंगद यास पाठविले. रावण शरण येत नसल्याने मग धर्म शास्त्रानुसार त्याच्या सोबत युद्ध करत अद्भुत आणि अलौकिक प्रसंगा नंतर लंकेवर विजय मिळावला दरम्यान बंधु लक्ष्मण यांना शक्ति लागली तो प्रसंग खुप कठिण आणि वेदनादायक होता. महाराज मनु व देवी सतरूपा या उभयतांनी नैमिष अरण्यात तपश्चर्या केली महाराज मनु व देवी सतरूपा यांचे घनघोर तप पाहुण निराकार निर्गुण ब्रह्म प्रसन्न होऊन समिप आले.महाराज मनु व देवी सतरूपा यांच्या इच्छेनुसार निर्गुण ब्रह्म सगुण रूपात पुत्र रूपाने येण्याचे अभिवाचन दिले तदनुसार महाराज मनु यांनी दथरथ अवतार धारण केला देवी सतरूपा यांनी कौशल्य अवतार धारण केला आणि नैमिष अरण्यात दिलेला शब्द पुर्ण करण्यासाठी भगवान प्रभु श्रीराम यांनी अवतार धारण केला.आणि आजच्या दिवशी प्रभु श्रीराम यांचा अयोध्या नगरी येथे जन्म झाला त्याला आपण राम नवमी असं संबोधतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजारांची सूट द्यावी

## प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या मागणीला पाठिंबा : खा.ओमराजे निंबाळकर

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** कोरोना काळानंतर महाराष्ट्रासह सबंध देशात वृत्तपत्र व्यवसायावर मोठा परिणाम झाला असून खप आणि जाहिरातींचे प्रमाणही कमी झाले आहे. यासाठी केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकरदात्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपयांची सूट द्यावी ही पत्रकार संघाच्या मागणी रास्त असून आपला पाठिंबा आहे. अशी ग्वाही धाराशिव लोकसभेचे विद्यमान खासदार आणि महाविकास आघाडीचे विद्यमान उमेदवार ओमराजे निंबाळकर यांनी दिली.प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केंद्र सरकारकडे केलेली मागणी वृत्तपत्रांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणारी आहे.त्यामुळे पुन्हा लोकसभेत गेल्यावर यासाठी पाठपुरावा करू असेही सांगितले.धाराशिव येथे मंगळवार दिनांक १७ एप्रिल २०२४ रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार तथा धाराशिव चे विद्यमान खासदार माननीय श्री ओमराजे निंबाळकर यांची पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले. यावेळी पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, राज्य कार्यकारणी सदस्य बाबासाहेब देशमाने यांच्यासह धाराशिव चे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील पत्रकार संघाचे धाराशिव येथील पदाधिकारी पत्रकार श्रीराम क्षीरसागर, रामेश्वर डोंगरे, सय्यद कलीम मुसा यासह पत्रकार बांधव उपस्थित होते यावेळी मागणी विषयी माहिती देताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले की, केंद्र सरकार खाजगी विमा कंपन्यांचा व्यवसाय वाढावा आणि लोकांनी विमा घ्यावा यासाठी विमा घेणाऱ्या ग्राहकाला वार्षिक उत्पन्न करात एका विमा हप्त्या इतक्या रक्कमेची सूट दिली जाते. तसेच अनेक छोट्या-मोठ्या उद्योगांना सरकार वेगवेगळ्या स्वरूपाची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आर्थिक मदत देते. याच धर्तीवर वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकर दात्यांना वार्षिक पाच हजार रुपयांची सूट दिली तर देशातील ३५ हजार कोटींच्या व्यवसायाला,उर्जित अवस्था प्राप्त होईल. यातून मागणी वाढल्याने मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. तसेच या व्यवसायातील लोकांना आर्थिक स्थिरता येईल. आणि वाचन संस्कृतीचीही जोपासना होईल. महाराष्ट्रात सध्या शासनाच्या यादीवर असलेले दीड हजार वृत्तपत्र व साप्ताहिके आहेत. या व्यवसायावर अवलंबून असणारे हजारो लोक आहेत. यासाठी आपण पुढाकार घ्यावा आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा अशी विनंती केली.देशातील मीडियाच्या आर्थिक हितासाठी ही मागणी रास्त असल्यामुळे मी या पाठिंबा देत आहे. मी लोकसभेच्या सभागृहात गेल्यावर हा विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करेल अशी ग्वाही ओमराजे निंबाळकर यांनी दिली.



## जातवैधता प्रमाणपत्राकरिता विशेष मोहिमेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 133 व्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्यामध्ये आयोजित 'समता पंधरवडा निमित्त सत्र 2023-24 करीता 12 विज्ञान आणि पदवी अभ्यासक्रम प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. सत्र 2023-24 मध्ये इयत्ता 11 वी व 12 वी मधील ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापपावेतो जात प्रमाणत्र पडताळणी केलेली नाही. अशा विद्यार्थ्यांनी आपला रितसर, परिपूर्ण भरलेला अर्ज जात प्रमाणपत्र पडताळणी करीता सादर करावा. तसेच व्यावसायीक अभ्यासक्रमास सीईटी व्दारे 2024-25 मध्ये प्रवेश घेऊ इच्छीत असणा-या (तंत्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाचे अंतिम वर्षाला प्रवेशित असणारे ज्यांना अभियांत्रीकी अभ्यासक्रमाचे थेट व्दितीय वर्षाला प्रवेश घ्यावयाचे आहे.) विद्यार्थ्यांनी आपला रितसर भरलेला अर्ज जात प्रमाणपत्र पडताळणी करीता सादर करावा. सत्र 2023-24 मध्ये इयत्ता 11 वी व 12 वी मधील ज्या विद्यार्थ्यांनी जात प्रमाणत्र पडताळणी करीता अर्ज सादर केलेले आहे. परंतु अपुर्ण पुराव्याअभावी ज्यांचे प्रकरणे त्रुटी मध्ये आहेत, अशा विद्यार्थ्यांनी त्रुटी पुर्ततेकरीता कार्यालयास संपर्क साधावा व लवकरात लवकर त्रुटींची पुर्तता करून घ्यावे.



## मानवता धर्म जगवण्यासाठी वृद्धाश्रम चालवणाऱ्या संस्थांना आर्थिक पाठबळ देणे गरजेचे : डॉ. ढगे

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** खडका रस्त्यावर असलेल्या व लोक सहभागातून चालविण्यात येणाऱ्या शरणपूर वृद्धाश्रमात पित्याच्या स्मृतिप्रित्यर्थ मुलांकडून अन्नदान उपक्रम राबविण्यात आला.मानवता धर्म जगविण्यासाठी वृद्धाश्रम चालविणाऱ्या संस्थाना आर्थिक पाठबळ देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शेतकरी मार्गदर्शक व कृषी शास्त्रज्ञ डॉ.अशोकराव ढगे यांनी यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी बोलतांना केले. सोमवारी दि.१५ एप्रिल रोजी सायंकाळी वृध्दाश्रमाच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून डॉ.ढगे हे बोलत होते.नजीक चिंचोली येथील हभप भाकचंद महाराज पाठक,खेडले काजळीच्या माजी सरपंच सौ. निर्मलाताई ढगे,शब्दगंध साहित्य परिषदेच्या नेवासा शाखेचे अध्यक्ष डॉ.किशोर धनवटे,समाजभूषण पांडुरंग रोडगे,प्रा.सचिन हुसळे,सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब गायकवाड,कार्यक्रम संयोजक दत्तात्रय गोंधळी,वृद्धाश्रम चालक रावसाहेब मगर,व्यवस्थापक संतोष मगर,विठ्ठल चव्हाण,सचिन गव्हाणे,बाळकृष्ण गायकवाड,काकासाहेब गोंधळी,भाऊसाहेब गोंधळी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.यावेळी समाजप्रबोधनकार स्वर्गीय गणपतराव गोंधळी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. उपक्रमाचे प्रेरक कवी दिगंबर गोंधळी यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.यावेळी समाजात निष्काम भावनेने सेवा देणाऱ्या ढगे व मगर दाम्पत्याचा आदर्श कुटूंब चालक म्हणून गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना हभप भाकचंद महाराज पाठक म्हणाले की जीवनाचा शेवट चांगला होण्यासाठी संत संगतीत राहून परमार्थ करणे ही काळाची गरज आहे,आई वडील हेच भूतलावरील तीर्थक्षेत्र असल्याने त्यांना जपा, शेवटच्या श्वासापर्यंत त्यांची सेवा करा,परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी चांगली कुवत आपल्यात निर्माण करा, स्वबळावर चालणाऱ्या वृद्धाश्रमांना आर्थिक पाठबळ उभे करा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी वृद्धाश्रमातील आजी आजोबांना मिष्टान्न भोजन देण्यात आले.शरणपूर वृद्धाश्रमाचे संपर्क प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर समाज प्रबोधनकार दिगंबर गोंधळी यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## एकोप्यातून धर्मकार्याची प्रेरणा वृद्धिंगत : भास्करगिरी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**शहरटाकळी :** गावो गावचा एकोप्यातून धर्मकारची प्रेरणा वृद्धिंगत होते देव देश धर्मकार्यासाठी तरुणांनी एकजुटीने पुढाकार घ्यावा , नागरिकांनी सत्कार्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, यश तुम्हाला मिळेल असे प्रतिपादन श्री गुरुदेव दत्त पिठ संस्थान देवगड चे महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराजांनी केले , शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांनी सदिच्छा भेट दिली यावेळी ते बोलत होते.

यावेळी इथापे परिवाराच्यावतीने गुरुवर्य भास्करगिरी महाराजांचे संत पूजन करण्यात आले, यावेळी गुरुदत्त नवनाथ महाराज काळे, कल्याण महाराज पवार, बाळकृष्ण महाराज कानडे, भरत महाराज लोंढे, गोरक्ष महाराज मीर्झे, भावी निमगावचे गणेश महाराज वाकळे, कीर्तनकार समृद्धी पराठे, अनिल मडके,संभाजी गवळी, वाय. डी. कोल्हे, अरूनभाऊ इथापे, गोविंद कावळे, ह.भ.प. गणेश गवळी, ह.भ.प. मोहन खंडगळे, गणेश खेडकर, ज्ञानदेव खराडे, मनोज घोंगडे, रामचंद्र गिरम, भजनी मंडळी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगर भूमापन कार्यालयाची तोडफोड, कर्मचाऱ्यांना मारहाण

## जितेंद्र बैसाणे यांच्यावर गुन्हा दाखल जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** नगर भूमापन अधिकार कार्यालयात दि 15 रोजी जितेंद्र विश्राम बैसाणे ह्या व्यक्तीने कार्यालयात येऊन कर्मचारी यांना अश्लील शिवीगाळ तसेच मारहाण करुन व कार्यालयातील शासकीय संपत्तीची तोडफोड करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने धुळे शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की नगर भूमापन अधिकारी धुळे या कार्यालयात दिनांक 15 रोजी कार्यालयाचे नियमित कामकाज चालु असताना मध्यान्होत्तर जितेंद्र विश्राम बैसाणे हे कार्यालयात 04 इसमाना सोबत घेऊन कार्यालयात आले व त्यांनी कार्यालयात प्रवेश करताच कार्यालयात कार्यालयीन काम करत असलेले कर्मचारी यांना मोठ्या आवाजात अश्लील शिवीगाळ चालु केली नंतर कार्यालयाच्या मुख्य हॉल मध्ये जाऊन परिरक्षण भुमापक श्री. धर्मेंद्र प्रभाकर खबाईत यांना शिविगाळ करुन मारहाण केली तसेच महिला कर्मचारी श्रीमती गेला सुधाकर भाबड परिरक्षण भूमापक यांनाही अश्लील शिवीगाळ केली व त्याच्या टेबलावरील लॅपटॉप उचलुन जमिनीवर आपटला व कार्यालयात असलेल्या इतर कर्मचा-यांना शिवीगाळ केली व कार्यालय प्रमुखाच्या दालनाच्या दरवाजास जोरात लाथ मारली व कार्यालयातील खुर्च्या आदळआपट करून फेकुन दिल्या तसेच तुम्ही या कार्यालयात काम कसे करतात तेच पाहतो असे बोलुन कार्यालयातील कर्मचा याना जीवे ठार मारण्याची धमकी दिली तदनतर या कार्यालयाच्या लगत असलेले मा. जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयात जाऊन गोंधळ माजवला व श्री सुनील नागरे प्रमुख लिपीक यांना व कार्यालयात असलेल्या इतर कर्मचा-यांना शिवीगाळ केली व कार्यालयीन कामात अडथळा निर्माण केला एवढ्यावरच न थांबता सदर इसम व त्याच्या सोबतच्या सहका यानी उप अधिक्षक भूमी अभिलेख धुळे या कार्यालयात येवुन कार्यालय प्रमुखाच्या दालनाच्या दरवाजास जोरात लाथ मारली त्यामुळे कार्यालय प्रमुखाच्या दालनाची नासधूस झाली आहे. श्री. जितेंद्र विश्राम बेसाणे याच्या या कुकृत्यामुळे कार्यालयातील कर्मचारी हे प्रचड तणावात असुन अत्यंत भयभित झाले आहेत त्यांची मानसिक स्थिती खराब झालेली आहे असे सांगण्यात आले व जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यात आली की श्री. जितेंद्र विश्राम बेसाणे या इसमावर व त्याच्या सहका-यांवर वरील कुत्य केल्यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई व्हावी.

# राजेश बेलेंच्या विकेट कीपिंगमध्ये मुनगंटीवारांची तडाखेबंद फलंदाजी तर धानोरकरांची दमछाक

आधुनिक केसरी

लोकसभा चषक 2024 च्या पहिल्या गटातील सामन्यांचे शेवटच्या शटकातील अंतिम तीन बॉल शिल्लक असताना चंद्रपूर वणी आर्णी लोकसभेच्या मतदारांनी खचाखच भरलेल्या मैदानावर राजेश बेले हे विकेट कीपिंग करून कोणाची विकेट घेतील आणि लोकसभा चषक 2024 कोण उंचावेल याकडे आता सर्व मतदार प्रेक्षकांचे लक्ष लागलेले आहे. लोकसभा चषक 2024 ची घोषणा झाल्यानंतर पहिल्या गटातील सामान्यांमध्ये चंद्रपूर वणी आर्णी क्षेत्रातील भाजपा टीमचे मुख्य फलंदाज सुधीर मुनगंटीवार यांनी टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि स्वतः मैदानामध्ये उतरत पहिल्या काही षटकांमध्येच तडाखेबंद फलंदाजी करत सुरवातीलाच आपला स्कोर वाढवायला सुरुवात केली. तर, काँग्रेस टीमच्या कप्तान प्रतिभा धानोरकर यांनी या मैदानावर गोलंदाजी करण्यासाठी आवश्यक असलेल्या आपल्या खेळाडूंना एकत्र करून क्षेत्ररक्षण करण्यामध्येच धानोराकरांची दमछाक होताना दिसते आहे. मुनगंटीवार यांनी पहिल्या स्पेल मध्येच आपला स्कोर हलता ठेवण्यासाठी चोरोट्या धावा काढत हळूहळू चौकार षटकारांची सुरुवात केली आणि या मॅचमध्ये आपला स्कोर चांगला राहील या दृष्टीने ते सुरुवातीपासूनच प्रयत्न करत राहिले. त्यासाठी त्यांना त्यांच्या खेळाडूंची आणि टीम मॅनेजर सह प्रशिक्षकांची चांगली साथ लाभली. परंतु धानोरकरांच्या बाबतीत मात्र त्यांचे टीम मॅनेजर आणि प्रशिक्षकांनी योग्य पद्धतीने व्यवस्थापन न करता धानोरकरांना मैदानात उतरविले. त्यामुळे आपल्या सहकारी खेळाडूंच्या माध्यमातून होणाऱ्या क्षेत्ररक्षणासाठी आवश्यक त्या खेळाडूंच्या निवडीसाठी आणि त्यांना संघ भावनेतून मैदानावर उतरवण्यासाठी अथक परिश्रम करावे लागले. भाजपाच्या टीमने मुनगंटीवार यांच्यासारख्या अनुभवी फलंदाजाला मैदानात उतरवल्यामुळे त्यांनी कमकुवत क्षेत्ररक्षणाचा फायदा घेत चोरट्या धावा काढायला सुरुवात केली होतीच . परंतु योग्य संधी पाहत त्यांनी चौकार व षटकार सुद्धा हाणले. मुनगंटीवार यांच्या नाबाद खेळीमुळे त्रस्त झालेल्या धानोरकर यांना अखेर संघभावणेतून खेळणाऱ्या सहकारी खेळाडूंच्या योग्य मदतीसाठी योग्य प्रशिक्षकाद्वारे मार्गदर्शनाची गरज भासू लागली. हे पाहून संघ व्यवस्थापनाच्या मालकांनी ड्रेसिंगरूम मध्ये अनुभवी मार्गदर्शक व प्रशिक्षकाचे कान टोचले असावेत म्हणून अखेरच्या षटकांमध्ये आपल्या खेळाडूंना एकत्रित करून त्यांच्यामध्ये




संघभावना निर्माण व्हावी व शेवटच्या शटकात बाउन्सर टाकत तडाखे बंद फलंदाजीला आळा घालण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू झाला. गांधी, खरगे, पटोले, वडेट्टीवार, देशमुख, पवार, ठाकरे यांच्यासारख्या अनुभवी गोलंदाज यांच्या अभावी कन्हैया कुमार सारख्या नवोदित बॉलरला अंतिम शतकात उतरविण्यात आले . याचा कोणताही फायदा धानोरकरांना झालेला दिसत नाही . तर आपल्याच टीम मध्ये संघभावना नसल्यामुळे आणि अनुभवी फलंदाजाच्या समोर कसे जावे याचाही दीर्घ अनुभव नसल्यामुळे कप्तान धानोरकर यांची चांगलीच दमछाक झालेली मतदार प्रेक्षकांनी पाहिले . असे असले तरी मतच आपल्या हातात राहावी यासाठी धडपडणाऱ्या धानोराकरांच्या सुरू असलेल्या प्रयत्नाला प्रेक्षकांनी चांगलाच उत्स्फूर्त प्रतिसाद दिलेला आहे . त्यामुळे त्यांचे मनोबल वाढत असले तरी आता मॅचचा शेवटचा ओव्हर सुरू असून या ओव्हर चे शेवटचे तीन बॉल मध्ये काय चमत्कार घडविता येऊ शकेल याची रणनीती धानोरकर आखताना दिसत आहेत. तर मुनगंटीवार मात्र अजूनही मैदानावर आपली बॅट सरसावून उभे आहेत. आता अंतिम शतकाचे फक्त तीन चेंडू शिल्लक राहिलेले आहेत. या दरम्यान विकेट कीपिंग करत असलेले राजेश बेले हे आता नेमकी कोणाची स्टंपिंग करून विकेट घेतील आणि लोकसभेचा चषक उंचावण्याची संधी ते भाजप आणि काँग्रेस पैकी कोणत्या टीमला देतील याकडे आता संपूर्ण चंद्रपूर वणी आर्णी लोकसभेच्या मैदानातील प्रेक्षकांचे लक्ष लागलेले आहे.

## कु. दिशा व धनराज विक्रम घंटे यांनी सह्याद्री इंग्लिश स्कूलमध्ये मिळवले घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** सह्याद्री इंग्लिश स्कूल लोहा येथे शाळेतर्फे घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धेमध्ये उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांपैकी दिशा विक्रम घंटे हिने इन आऊट लीड या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक पटकावले व लीड कॉन्फरन्समध्ये द्वितीय क्रमांक मिळवला व धनराज विक्रम घंटे याने मनी इन द बकेट या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला या दोन भावंडांचा शाळेतर्फे ट्रॉफी सर्टिफिकेट व नगदी रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. सोबतच विद्या तुळशीराम झुरळे टॉप फिफ्टी मध्ये पारितोषिक मिळवले. तनुजा तुळशीराम जोरूळे सायन्स एक्झिबिशन मध्ये व गायत्री गीताराम डवरे आयएसओ गोल्ड मेडल या विद्यार्थ्यांनी सह्याद्री ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मध्ये घवघवीत यश संपादन करून शाळेचे व आपल्या शहराचे नाव उंचावले त्याबद्दल त्यांचा सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुकांचा वर्षाव होत आहे.




## मतदान करणाऱ्यांना मिळणार आता आझाद बगीच्यात मोफत प्रवेश

### चंद्रपूर मनपाचा अभिनव उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा मतदारसंघात 19 एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या मतदानात मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासनातर्फे अंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत असुन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे 19 एप्रिल रोजी जे नागरीक मतदान करतील,ज्यांच्या बोटाला शाई असेल त्यांना 19 व 20 एप्रिल रोजी आझाद बगीच्यात मोफत प्रवेश दिला जाणार आहेण् 13 - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे 19 एप्रिल 2024 रोजी सकाळी 7 ते सायंकाळी 6 या वेळेत होणार आहे. या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध प्रयत्न प्रशासनामार्फत केले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून नागरिकांच्या घरापर्यंत पोहचून 'मतदार चिठ्ठी' चे वाटप प्रशासनातर्फे करण्यात येत आहे. या मतदार चिठ्ठीद्वारे आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करता येते तसेच मतदान केंद्र कुठे आहे याचीही माहिती मिळते.

या वाटपादरम्यान जर काही नागरिकांना मतदार चिठ्ठी मिळाली नसेल तर त्यांना आपल्या बूथ लेव्हल ऑफिसरशी (बीएलओ) संपर्क करता येईल किंवा व्होटर हेल्पलाईन ॲपवर जाऊन व्होटर सर्विसेसमध्ये,नो युवर पोलिंग स्टेशन डिटेल्समध्ये जाऊन आपला व्होटींग कार्ड नंबर टाकून माहिती करून घेता येईल. त्याचप्रमाणे HTTPS://ELECTORALSEARCH.ECI.GOV.IN/POLLINGSTATION या लिंकवर जावून माहिती करून घेता येईल किंवा चंद्रपूर महानगरपालिकेच्या 18001237980 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करून मतदार चिठ्ठीबाबत माहिती घेता येईल.

तेव्हा सर्व नागरिकांनी १९ एप्रिल रोजी मतदान करून जागरूक नागरिकाचा हक्क बजावण्याचे आवाहन चंद्रपूर शहर महानगरपालिकेद्वारे करण्यात येत आहे.

## अम्माच्या हस्ते अम्मा की दुकानचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** निराधार गरजू महिलांना स्वयंरोजगारातुन आत्मनिर्भर बनविण्यासाठी स्व. प्रभाताई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून अम्मा की दुकान हा उपक्रम राबविल्या जात आहे. सदर उपक्रमाअंतर्गत बंगाली कॅम्प येथील मालती देवनाथ या निराधार महिलेला अम्मा का दुकान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

सदर दुकानाचे गंगुबाई उर्फ अम्मा जोरगेवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, बंगाली समाज महिला शहर प्रमुख सविता दंढारे, युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, सायली येरणे, अल्पसंख्याक विभागाच्या महिला शहर प्रमख कौसर खान, आशा देशमूख, विमल कातकर, शमा काजी, निलिमा वनकर, अनिता झाडे आदिंची उपस्थिती होती. आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने अनेक समाज उपयोगी उपक्रम राबविले जात आहे. त्यांच्या संकल्पनेतून सुरु असलेल्या अम्मा का टिफिन हा उपक्रम राज्यभर चर्चीला जात आहे. सदर उपक्रमा अंतर्गत गरजवंताच्या घरी दररोज जेवणाचा टिफिन पोहचविला जात आहे. दरम्यान आता त्यांच्या संकल्पनेतून स्व. प्रभाताई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अम्मा कि दुकान हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. निराधार महिला आणि दिव्यांग बांधवांन समोर रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. स्वताचा रोजगार सुरु करण्यासाठी लागणारे भांडवल त्यांच्याकडे नसल्याने त्यांच्या पुढे मोठी अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे दुस-यांकडे अल्पश्या वेतनात काम करण्याची वेळ त्यांच्यावर ओढावली आहे. ही बाब लक्षात घेता आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून सदर उपक्रम सुरु करण्यात आला असून स्वयंरोजगारातुन समाजातील या घटकाला आत्मनिर्भर बनविण्याचा प्रयत्न केल्या जात आहे.

विशेष म्हणजे. अम्मा स्वता फुटपाथवर टोपल्या विकण्याचे काम करते. अशात स्वताचे दुकान नसल्यास उद्वभवणा-या त्रासाचा तिला चांगला अनुभव आहे. दरम्यान सदर उपक्रमा अंतर्गत मतदार संघातील दोन दिव्यांग बांधवांना दुकान उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तर आज शहरातील बंगाली कँम्प येथील मालती देवनाथ या निराधार महिलेला दुकान उपलब्ध करुन देण्यात आली. आमदार किशोर जोरगेवार यांच्या मातोश्री अम्मा यांनी या दुकानाचे उद्घाटन केले. अम्मा स्वतः फुटपाथवर बसुन टोपल्या विकते त्यामुळे फूटपाथवर दूकान लावतांना येणा-या अडचणींची तिला जाण आहे. त्यामुळे आपण सदर उपक्रम सुरु केला असल्याचे अम्मा यांनी म्हटले आहे. ग्रामीण भागातील दिव्यांग बांधवांना आणि शहरी भागात निराधार गरजु महिलांना सदर दुकान देणार असल्याचेही अम्मा यांनी म्हटले आहे.



## आर्यन बहादुरे एमबीबीएस उत्तीर्ण

### कामगारांचा मुलगा झाला पहिल्याच प्रयत्नात डॉक्टर

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** आर्यन माधवराव बहादुरे या विद्यार्थीने एमबीबीएसचे शिक्षण पुर्ण केले असून तो पहिल्या प्रयत्नातच एमबीबीएस उत्तीर्ण झाला आहे. डॉ.आर्यन माधवराव बहादुरे या विद्यार्थीने आपल्या गरिबीचे भांडवल न करता जिद्द चिकाटी कठोर परिश्रम व अभ्यासात सतत सातत्य राखुन एमबीबीएसचे शिक्षण पुर्ण करुन विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण केला आहे. डॉ. आर्यन माधवराव बहादुरे यांचे मुळ गाव चौरबा ता.हदगाव जि.नांदेड असुन त्यांचे वडील माधवराव बहादुरे हे २० वर्षांपूर्वी विष्णूपुरीला कामानिमित्त आले त्यांनी सुरुवातीला एमआयडीसी मध्ये अनेक कारखान्यात काम केले. त्यानंतर विष्णूपुरी व नांदेड येथे अनेक काम धंदे करुन आपल्या मुलाला शिक्षण शिकविले.



आर्यन बहादुरे यांचे अंगणवाडी ते १० वी पर्यंत चे शिक्षण हे विष्णूपुरी येथे झाले . २०१७ सारी १० वी ला ९५ टक्के गुण घेऊन विष्णूपुरी मधुन प्रथम क्रमांक मिळविला त्यानंतर २०१९ नांदेड येथील यशवंत कॉलेज येथे १२ वी चे शिक्षण पुर्ण केले. आर्यन बहादुरे हा इयत्ता १ ली पासुनच अभ्यासात हुशार आहे त्याला अभ्यासाचा प्रचंड छंदच आहे तसेच इंग्रजी मध्ये अनेक कविता ही करतो. २०१९ मध्ये आर्यन १२ वी पास झाल्यानंतर एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश पुर्व नीट ची परीक्षा ही पहिल्याच प्रयत्नात ४७५ गुण घेऊन उत्तीर्ण झाला.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न भारतरत्न परमपूज्य बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेऊन आर्यन यांनी दिवसांतील १२ ते १४ अभ्यास करीत होता.

यात विशेष म्हणजे आर्यन यांनी कुठलेही खाजगी महागडे क्लासेसचे टीव्हीशेन न लावता घरीच अभ्यास करुन त्यांनी शिक्षणात घवघवीत यश मिळविले व त्यांचा एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय मेडिकल कॉलेज येथे प्रवेश मिळाला व त्यांनी एमबीबीएसचे शिक्षण ३० मार्च २०२४ ला पहिल्याच प्रयत्नात चांगल्या फस्ट क्लास गुणांनी पुर्ण केले व आपल्या आई वडीलांचे स्वप्न पूर्ण केले.

डॉ. आर्यन माधवराव बहादुरे यांनी एमबीबीएसचे शिक्षण यशस्वीपणे पुर्ण केल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीवर दगडफेक

## धानोरा महासिद्ध येथील घटना : दोन गटात हाणामारी, परस्परांवर ३२ जणांवर गुन्हे दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या मिरवणुका मोठ्या थाटामाटात हर्षोल्लासात पार पडल्या. परंतु तालुक्यातील धानोरा (महासिद्ध) येथे या मिरवणुकीला गालबोट लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूकवर दगडफेक, दोन गटांमध्ये हाणामारी होऊन परस्परविरोधी तक्रारीवरून दोन्ही गटाच्या ३२व्यक्तींवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. ह्यामधील ११ हे शालेय विद्यार्थी आहेत.
तालुक्यातील धानोरा (महासिद्ध) येथे सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मिरवणूक निघत होती.मुलं-मुली, लहान -मोठे सर्व डिजेच्या तालावर नाचत होते.डॉ.बाबासासेब आंबेडकरांचा विजय असो,अशा घोषणांनी परिसरात वेगळेच वातावरण निर्माण झाले होते.सारं काही शांततेत चालू होते. वर्षातून एकदाच येणाऱ्या बापाच्या जयंतीत तरूण पोरं बिंधास्त नाचत होते. मिरवणूक गावाच्या मध्यभागी आली होती. सर्वत्र आनंदाचे वातावरण असतांनात अचानक मिरवणुकीवर तुफान दगडफेकीला सुरुवात झाली.अचानक झालेल्या या दगडफेकीत बऱ्याच भिम अनुयायांना मार बसला. एका क्षणात वातावरण बदललं.आनंदावर जणू विरझन पडलं. मिरवणुकीतील सहभागी लोकांना मारहाण व शिवीगाळ करू लागले. मनातून कधीच जात नाही ती जात असते असते याचा प्रत्यय आला.जातीवादी मानसिकतेतून केलेल्या या हल्यात दोन्ही गटात फ्री स्टाईल हाणामारी झाली.

सदर घटनेची तक्रार धानोरा महासिद्ध येथील सौ.रवीना गुलाब अवचार या महिलेने पोलीस स्टेशनला दिली. त्यावरून पोउपनि शुध्दोधन नितनवरे यांनी तेरा जणांविरुद्ध कायमी अप क्र २३७/२०२४ कलम १४३,१४७,१४९,३३६,३२३,५०६ भादंवि.सहकलम ३(I) (R), (S), ३(२) (VA) अॅट्रॉसिटी अॅक्ट नुसार गुन्हे दाखल केले.

ह्या १३ जणांमध्ये आरोपी - १. आनंद गोपाळ वानखडे जात -सुतार व त्याचे सोबत तेथे हजर असलेल्या २. आनंद शांताराम पैसोडे, जात -कुनबी ३ शुभम पुरेषोत्तम उमाळे, जात कुनबी ४. अमर तुफानसिंग कुवारे, जात पारधी ५ सुनिल सुरेश कुवारे, जात - पारधी ६. डिगांबर हिवरकार, जात - कुंभार ७. गजानन चांगदेव वाघमारे, जात - धनगर ८. आनंद निर्मळ, जात - कुनबी ९ दयानंद रामु निर्मळ जात - कुनबी १०. राजु मारुती घुले, जात -धनगर ११. ओम चव्हाण, जात -पंचाई १२. अनिल पातोड, जात धनगर १३. अश्विन वसंता उमाळे जात कुनबी सर्व राहणार धानोरा महासिध्द, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा. यांचा समावेश आहे.
तर परस्पर विरोधी तक्रार धानोरा येथीलच सुनील कुवारे यांनी दाखल केली. त्यांचे तक्रारीवरूनकायमी अप क्र. २३९\२४कलम १४३,१४७,१४८ १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६ भादंवि. नुसार १९ जणांविरुद्ध पोहेका ज्ञानसिंग राठोड बनं १५३८ यांनी गुन्हे दाखल केले.
त्यातील आरोपी - १. किरण दादाराव अवचार, २. संघपाल अवचार, ३. विजय साहेबराव वाकोडे, ४. प्रणव गोपाल अवचार, ५. श्रीतीज गोपाल अवचार ६. रवि सागर सावळे, ७. दिपक सावळे, ८. संकेत अवचार, ९. अनिल वानखडे, १०. योगेश वले, ११, विशाल वानखडे, १२. संघदीप ससाने, १३. नितेश वानखडे, १४. नरेंद्र इंगळे, १५. अतुल रायपुरे, १६. दिनेश रमेश वानखडे, १७. अविनाश वानखडे, १८. सुनिल जंगलु खंडेराव, १९. तेजराव शेषराव वानखडे, सर्व रा. धानोरा महासिध्द, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा. जात बौद्ध
गतवर्षी सुद्धा एका लग्नाच्या मिरवणुकीमध्ये दोन गटांमध्ये असाच वादविवाद निर्माण झाला होता, परंतु परस्पर सामंजस्य मुळे तो मिटला होता. हे सर्व पोलिसांना ज्ञात होते परंतु हा वाद कधी ना कधी विकोपाला जाईल हे पोलिसांना ज्ञात असताना सुद्धा केवळ तय्यब अली हे एकच पोलीस कर्मचारी जयंतीच्या मिरवणुकीसाठी तैनात केलेले होते.ह्या तय्यब अली ला कायदा सुव्यवस्थेचे मुळीच गांभीर्य नाही कायदा सुव्यवस्थेपेक्षा अवैध धंद्यांचे हप्ते गोळा करण्यातच अली हे धन्यता मानतात.
मिरवणुकीमध्ये दगडफेक ,शिवीगाळ, हाणामारी झाल्यानंतर ठाणेदार आनंद महाजन हे स्वतः त्यांच्या स्टाप सह तात्काळ उपस्थित झाले. त्यानंतर अ.पो.अ अशोक थोरात खामगाव,उपविपोअ. देवराव गवळी, पोनि महाजन, पोउपनि नारायण सरकटे हे घटनास्थळी दाखल झाले. ह्या दोन्ही घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नारायण सरकटे हे करीत आहेत.
या सर्व घटनेला स्थानिक पोलीस हेच जबाबदार आहेत असे म्हटले तरी वावगे होणार नाही. कायदा व सुव्यवस्थेला ठाणेदार हे गांभीर्याने घेत नाहीत. कित्येक गुटखा,अवैध दारू विक्री,अथवा देशी कट्टे पकडण्याचे सर्व कामे जिल्हास्तरावरील स्थानिक गुन्हे शाखा(एल.सी.बी) करीत आहे. पण स्थानिक पोलिसांना याचे काहीही घेणे देणे नाही. अगदी काल परवांची सुळजःपिंपळगाव ची घटना बघता पोलिसांचा जनसामान्यांवर वचक राहीलेला नाही. धानोरा येथील घटनेत पोलीस बंदोबस्त वाढवला असता तर झालेला अनर्थ टाळता आला असता. तत्कालीन ठाणेदार सुनील अंबुलकर, दिनेश झांबरे यांचा जो वचक होता तो विद्यमान ठाणेदारांचा नाही. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी ह्या बाबीची दखल घेतली नाही तर कायदा व सुव्यवस्थेचे अजून वाभाडे निघल्याशिवाय राहणार नाही, एवढे मात्र खरे !



# अध्यक्षपदी गोविंद झडपे तर सचिवपदी वेदांत कानडे यांची सर्वानुमते नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** शहरातील सोमवंशी क्षत्रिय कासार समाजाची 15 एप्रिल रोजी कालिंका देवी मंदिर कासार गल्ली रिसोड येथे बैठक पार पडली या बैठकीमध्ये समाजाची नवनिर्वाचित युवा कार्यकारणी चयन करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक राजेश्वर मोहिरे व प्रमुख पाहुणे सुरेश खरावन सर व समाजसेवक किशोरजी महाजन हे होते. तर दिलीप झडपे, भारत झडपे, राहुल आहेर, मंचावर उपस्थित होते. अनेक दिवसापासून गठीत असलेली कासार युवा संघटनेची कार्यकारिणी समाजाकडून गठीत करण्यात आली. या कार्यकारणी मध्ये अध्यक्ष गोविंद झडपे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली सचिव म्हणून वेदांत कानडे, उपाध्यक्ष शुभम आहेर ,सहसचिव रोहित हलगे, कोषाध्यक्ष देवाशिष झडपे, संघटक भावेश आहेर, प्रसिद्धीप्रमुख आकाश झडपे, यांची नियुक्ती करण्यात आली. नवीन कार्यकारणीची नावे श्री सोमवंशी कासार समाजन्नोती मंडळ विभागीय अध्यक्ष राजेश्वर मोहिरे यांनी जाहीर केले. यावेळी उपस्थित सर्व समाज बांधवाकडून नवीन कार्यकारिणी चे स्वागत करण्यात आले. त्यानंतर नवनियुक्त कार्यकारणी कडून सोमवंशी क्षत्रिय कासार समाजामधील उत्कृष्ट कार्य करण्या-या समाज बांधवांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन अमर कानडे यांनी केले तर आभार प्रदर्शन राहुल आहेर यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने कासार युवक व समाज बांधव उपस्थित होते.

# बल्लारशा रेल्वे स्टेशन मालगाडी रुळावरून घसरली, पण मोठा अपघात टळला

आधुनिक केसरी न्यूज



**बल्लारपूर :** बल्लारपूर येथे अल्ट्राटेक सिमेंट कारखान्यातून सिमेंट घेऊन जाणारी मालगाडी आज दुपारी १२.१५ वाजता अहमदनगरच्या दिशेने जात असताना जी-१३ क्रमांकाची मालगाडी स्टेशन यार्डातून बाहेर पडताच अचानक रुळावरून घसरल्याने मोठा अपघात टळला. त्यानुसार नागपूरच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वे मार्गावर मालगाडी सुरू होताच मोठा आवाज झाल्याने सर्वत्र घबराट पसरली होती. ही गाडी मंद गतीने रुळावरून घसरली होती. या घटनेमुळे प्रवासी गाड्यांवर कोणताही परिणाम होणार नसून दहा ते बारा तासांनंतर सुधारणा होण्याची शक्यता आहे. या विषयी स्टेशन मास्टर रविंद्र नंदनवार यांना विचारले असता त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केले.

# होळकरशाहीच्या इतिहासापासून आपण लांब राहिलो : करिश्मा गावडे

## पाडेगावच्या महापुरुष जयंती महोत्सवात व्यक्त केली खंत

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** जोपर्यंत आपल्या अंगातलं रक्त सळसळत नाही. तोपर्यंत इतिहास कधीच घडत नाही.इतिहास घडविणारी माणसं कधीच इतिहास विसरु शकत नाहीत आणि इतिहास विसरणारी माणसं इतिहास घडवू शकत नाहीत. हा एक इतिहास आहे. अगदी त्याचप्रमाणे इतिहास घडविणाऱ्यांचा कधी प्रपंच घडत नसतो आणि प्रपंच करणाऱ्यांचा कधी इतिहास लिहिला जात नसतो. हा सुद्धा एक इतिहासच आहे. खरतर मराठ्यांचा इतिहास, होळकरशाहीचा इतिहास सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा. इतका ओजस्वी,इतका तेजस्वी इतिहास ह्याच मातीमध्ये घडला.परंतु साक्षात आपण मराठे ह्याच इतिहासापासून लांब राहिलो.ही फार मोठी शोकांतिका आहे. असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्यात्या करिश्मा गावडे-पाटील यांनी केले.त्या पाडेगाव ता.फलटण येथे पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महापुरुष जयंती महोत्सवाच्या कार्यक्रमात बोलत होत्या.यावेळी त्यांनी जयंती महोत्सवातून "होळकरशाहीचा क्रांतिकारी इतिहास" ह्या विषयावर मनोगत व्यक्त केले.यावेळी सोपानराव आटोळे उपस्थित होते.
पुढे करिश्मा गावडे म्हणाल्या की,ज्या मातीमध्ये आपण राहतो.ती माती नेमकी कशी आहे.ज्या महाराष्ट्रात आपण राहतो.तो महाराष्ट्र नेमका कसा आहे.महाराष्ट्र म्हणजे मराठी मनांचा महाराष्ट्र,मावळ मातीचा महाराष्ट्र,दऱ्या खोऱ्याचा महाराष्ट्र, दुसऱ्याच्या ताटातून भाकरी हिसकावून घेणं ही झाली विकृती,परंतु आपल्या घासातला अर्धा घास इतरांस भरविणे.हीच तर आहे. आपल्या महाराष्ट्राची अन देशाची लाख मोलाची संस्कृती आहे.ज्ञान किंवा शिक्षण ही अशी उंच इमारत आहे की,तिचं बांधकाम कधीही संपत नाही. यासारख्या अनेक मुद्यांना त्यांनी हात घातला. तसेच पाडेगाव सामाजिक विकास फाउंडेशनच्या वतीने ज्या पद्धतीने महापुरुष जयंतीचे आयोजन केले जाते. त्याबद्दल सुद्धा करिश्मा गावडे पाटील यांनी विशेष कौतुक केले. यावेळी पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशनचे प्रमुख ।गिरीश बनकर म्हणाले की,स्वतःच्या जीवाची पर्वा न करता धडाडीने शत्रूचा सामना करणारी एक बाई खऱ्या अर्थाने स्वराज्य चालवू शकते का? तर हो अहिल्याबाईंकडे बघितलं की आम्हाला शंभर टक्के विश्वास पटतो.
अहिल्याबाईंना आम्ही अहिल्यादेवी केलं.हातात पिंड दिली.आणि त्यांच्या शौर्याला खऱ्या अर्थाने तिलांजली वाहिली. हातातली पिंड अशी दर्शविते की अहिल्याबाई ह्या धर्मवादी, दैववादी होत्या आणि त्यांना त्यांच्या कर्तव्यापासून दूर लोटण्यासाठी हे अशा पद्धतीचे चुकीचे आणि खऱ्या अर्थाने वेगळे दैववादी विचार आमच्या बाल चमुंच्या मनावरती आणि त्याचबरोबर या समस्त बहुजनांच्या मनावर कोरले गेले.जी अहिल्या खऱ्या अर्थाने हातात तलवार घेऊन खऱ्या अर्थाने संपूर्ण राज्य रणझुंजार पणे लढत होती. ती अहिल्या एक बाई होती. मग तिला बाई म्हणून घ्यायला, बाई म्हणायला आम्हांला लाज वाटते. त्याचं कारण असे आहे. एक बाई स्वराज्याचा गाढा हाकूच शकते.हे इथल्या पुरूषसत्ताक संस्कृतीला कधीही परवडणारं, झेलणारं, पेलणारं आणि रुचणारं पण नाही आणि त्याच कारणास्तव अहिल्याबाईंना अहिल्यादेवी करून आम्ही दैववादी चमत्कारिक रूपात त्यांना मांडत आहोत.त्यांच्या हातातली तलवार काढून त्यांच्या हातात पिंड देत आहोत, असे सुद्धा त्यांनी म्हटले. गिरीश बनकर पुढे म्हणाले की,हा असा बुरसटलेला इतिहास आमच्या अहिल्याबाईंच्या माथी मारण्याचं काम काही मनुवादी वृत्ती करत आहेत.आमची अहिल्या ही हातात तलवार घेऊन,घोड्यावर स्वार होऊन,संपूर्ण स्वराज्याचं रक्षण करण्यासाठी सामर्थ्यवान स्त्री म्हणून खऱ्या अर्थाने पुढं आली होती.आमच्या अहिल्याच्या मनात,मन मेंदू आणि मनगट जिच्या सामर्थ्याने प्रफुल्लित झालं होतं.
सर्वशक्तिमान असणारी ही आमची माऊली रघुजी पेशव्याला एका पत्रात गार करते.शस्त्र उठवायची वेळच येत नाही.एवढी कर्तव्य रागिणी आमची रणरागिणी आमची अहिल्या आणि त्या अहिल्याबाईंना अहिल्यादेवी म्हणून संबोधतो.तिथं कुठं तरी आमच्या मनाला त्रास होतो.कारण देव आणि देवी म्हटलं की तिथं दैवत्व आलं. दैवत्व म्हटलं की तिथं चमत्कार आला. आणि चमत्कार म्हटलं की आपसूकच तिथे नमस्कार आला. आमच्या अहिल्याबाईनी कुठं तरी हात केला म्हणजे त्रिशुळ सुटला,भाला सुटला,बाण सुटला असं कधी घडलं नव्हतं.तर तिने महिलांचीच फौज घेऊन खऱ्या अर्थाने हे स्वराज्य रक्षणाचं कार्य केलं होतं, असे सुद्धा गिरीष बनकर यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सरतेशेवटी सर्वांना भारतीय संविधानाच्या उद्देशिका प्रत देण्यात आल्या.

# थकबाकीमुळे वीस दिवसांपासून पांगरीकर अंधारात

## पिठाच्या गिरण्या बंद पडल्याने शेजारी गावातून आणावे लागते दळण

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** पागंरी गावात विद्युत थकबाकी असल्यामुळे महावितरणे विद्युत पुरवठा बंद केल्यामुळे वीस दिवसांपासून अख्ख पांगरी गाव अंधारात आहे. यामुळे ऐन उन्हाळ्यात पाणी टंचाई भासत असुन पाणी टंचाईचा सामना गावकऱ्यांना करावा लागत आहे.

एवढेच नसून पिठाच्या गिरण्या बंद पडलेले असल्याने आजुबाजुच्या शेजारी गावातून दळून आणावे लागत आहे. अन्य मुलभुत समस्या वाढले असल्याने गावकऱ्यांत संतापाची लाठ पसरली आहे.

धर्माबाद तालुक्यातील करखेली सबस्टेशन अंतर्गत पांगरी गाव असून येथील लोकसंख्या दोन हजार आहे. विद्युत मिटर एकुण २५५ होते. यातील बरेच वर्षांपासून विद्युत थकबाकी असल्यामुळे २१० मिटरचे कनेक्शन कट करण्यात आले होते. ४५ मिटर रंनिग मध्ये होते. त्यातील दहा मिटरच रेगलूर बील भरत होते. बाकी मिटर धारक बील भरत नव्हते. बेकायदेशीर आकडे टाकून लाईट घेत होते. यावर महावितरणला काही फायदा होत नव्हता. अख्ख



गाव थकबाकी असल्यामुळे महावितरणने गावच विद्युत पुरवठा बंद करण्याचा संकल्प घेतला. पिडी मिटरचे चोवीस लाख थकबाकी असल्यामुळे धर्माबाद महावितरणे अख्ख गावची लाईट दि.२५ मार्च २०२४ रोजी बंद करण्यात आले. आज विस दिवश झाले अख्ख गाव अंधारात आहे. यामुळे जनजिवन विस्कळीत होत आहे. सध्या

१ ) पांगरी गावात थकबाकी झाली असून नोटीस देऊन लाईट पुरवठा बंद करण्यात आला आहे . गावातील ऐंशी टक्के तर थकबाकी वसुली पाहिजे पण पांगरी गावात दहा टक्के सुध्दा वसुली नाही . यावर सवलत म्हणून टप्प्याटप्प्याने हफ्ते पाडून पैसे भरण्यास सांगु .पहिला हफ्ता सर्वांनी भरल्या नंतर लाईट चालू करण्यात येईल .असे करखेली डिव्हीजनचे अभियंता जाधव यांनी सांगितले .

२) रेगुलर लाईट बील भरतात त्यांच्या वर अन्याय होतो, गव्हासोबत किडेही रघडले जाते, ते सुद्धा अंधारात आहेत .सध्या लाईट अभावी जनजीवन विस्कळित होत आहे असे मत सुभाष लोखंडे यांनी सांगितले .

३ ) गावात पाणी टंचाई होत आहे, रात्रीला पाणी भरावे लागते, दळण बाहेर गावाहून आणावे लागत आहे लाईट नसल्याने रात्रीला बाहेर झोपताना विंचू किड्यांची भीती वाटत आहे .असे मत प्रकाश अमृता खंदारे यांनी सांगितले .

उन्हाळ्याचे दिवस असुन पाणी टंचाई निर्माण झाली असून उकीरडा होत आहे.

रात्रीला बाहेर झोपताना विंचू किड्याची भिती निर्माण झाली आहे एवढेच नसुन लाईट अभावी पिठाच्या गिरण्या बंद पडलेले असून शेजारच्या करखेली, जुन्नी, राजापुर या तीन- चार कि.मी. अंतरावरून दळूण आणावे लागत आहे. गावात हातपंप नसुन गावात आहे ते दोन पाण्याचे बोअर बंद पडल्याने पाण्याचे स्रोत बंद अवस्थेत आहेत त्यामुळे भिसन पाणी टंचाई निर्माण झाली असून फिल्टर पाणी विकत घ्यावे लागत आहे. हेच फिल्टर पाणी आंघोळीसाठी, कपडे धुण्यासाठी वापरावे लागत असल्याने चागंलाच आर्थिक फटका बसत आहे. नागरीक कसे तरी पाण्याचा काटकसरीने वापर करित असले तरीही जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची फार गंभीर समस्या निर्माण झाली आहे. मोबाईल मध्ये चार्जींग नसल्याने बहुतांश जनाचे मोबाईल बंद पडले असल्याने संपर्क तुटला आहे. काही जनांनी बाहेर गावी येऊन मोबाईल चार्जींग करतात. रात्रीला डासांचे प्रमाण जास्त असल्याने लहान बालके पंखा शिवाय झोपत नाहीत. या व्यतिरिक्त मुलभुत समस्या निर्माण झाले असुन गावकरी त्रस्त झाले आहेत. एवढेच नसुन गावातील बाईलेकी, सगेसोयरे गावात येणे बंद केले आहे, गावातील काही नागरिक नातेवाईकच्या घरी बाहेर गावी जाऊन राहतात.



# करण काटकरची अग्नीवीरसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील करण गणेश काटकर याची भारतीय सैनिक दलात अग्नीविर म्हणून निवड झाल्याने कुटुंबीय नातेवाईक मित्रमंडळी यांच्याकडून त्याचे कौतुक सत्कार अभिनंदन करण्यात येत आहे. आई वडील बहीण नातेवाईक तथा मित्रमंडळीने त्यांना खुफ आनंद झाला असून त्याचे कौतुक करत सत्कार अभिनंदन केले आहे.

# मोलखेडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथे दिनांक १४ एप्रिलला विश्वरत्न महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे उपस्थित होते. ग्रांमपंचायत उपसरपंच गुलाबसिंग राणा ग्रामसेवक सुरेखा पवार मॅडम व ग्रांमपंचायत अतुल इंगळे व पदाधिकारी जेष्ठ नागरिक रामभाऊ वारगंणे अभिमान वारंगणे योगेश जाधव, कैलास सुरडकर, दिपक जाधव, गणेश जाधव, सिद्धार्थ जाधव, अर्जुन जाधव, रमेश इंगळे, प्रकार तायडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रत्येक नागरिकाने आत्मसात करून आपले जीवनमान उंचावे प्रत्येक पालकांनी पाल्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रयत्न करावे असे मत व्यक्त केले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस जेष्ठ नागरिक रामभाऊ वारंगणे व योगेश जाधव यांनी माल्यार्पन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व आभार संघनक चालक सोयगाव युवा सेना तालुका अध्यक्ष अतुल इंगळे यांनी केले.भारतरत्न डा. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच देशाची अखंडता व राष्ट्रीय एकात्मता टिकून राहीली आहे.

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार हे भारतीय राज्य घटनेचा आदर करणारे सरकार असून अनेक क्रांतीकारक निर्णय घटनेच्या चौकटीत बसवून घेत असल्याचे मत योगेश जाधव सामाजिक कार्यकर्ते यांनी रविवारी ता. १४ एप्रिल रोजी व्यक्त केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य अतुल इंगळे म्हणाले की, एक कणखर पंतप्रधान देशाले लाभले असून भारतीय राज्य घटनेचा आदर करणारे पंतप्रधान आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आचार विचार समाज बांधवानी अंगिकारून आपल्या जिवनात यश संपादन करावे असेही त्यांनी यावेळी सांगितले. तर यावेळी कैलास सुरडकर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे आपल्या देशाची किर्ती जागतिक स्तरावर उंचावली असून भारतीय राज्यघटना वंदनीय माननारे पंतप्रधान असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आदी मान्यवर आणि पदाधिकारी, नवतरुण मित्र मंडळ, भीमसैनिक व ग्रामस्थ मोठ्या उपस्थित होते.

# जिल्हा सरचिटणीसपदी सत्तार पटेल यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील लोणी येथील सामाजिक कार्यकर्ते



सत्तार शब्बीर पटेल लोणीकर यांची भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्याक (छत्रपती संभाजी नगर)जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली.

विधानसभा माजीअध्यक्ष आ. हारीभाऊ नाना बागडे, आ. प्रशांत बंब, अल्पसंख्यांक प्रदेश अध्यक्ष इद्रीस मूलतानी, जिल्हा आध्यक्ष संजय खंबायेते यांच्या उपस्थितीत अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष नबी पटेल यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. नियुक्तीबद्दल जि.प. माजी उपाध्यक्ष एल जी गायकवाड़, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पा. वाकळे, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पा. नलावडे, विकास पा. कापसे, दिनेश अंभोरे, प्रभाकर शिंदे, युवराज ठेंगडे, आविनाश कुलकर्णी, शिवाजी गायकवाड़, सतीश खंडागळे, मुक्तार पठान, बंडु शिंदे यांच्या सह पक्ष कार्यकर्ते पदाधिकारी नातेवाईक मित्रमंडळी चाहते यांनी अभिनंदन केले.

# बंधाऱ्याचे सिमेंट बांधकाम निकृष्ट दर्जाचे

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे चालू असलेले कोल्हापूर बंधाऱ्याचे कामा अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम सुरू आहे याकडे कोणी लक्ष देईल का असे मत अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे मराठवाडा विभागिय अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांनी व्यक्त केले आहे.सविस्तर माहिती अशी की सावळदबारा शिवारामध्ये गावालगत असलेल्या नदीपात्रावरसिमेंट बांधाचे काम सुरू असूनहे काम रामभरोसेअसल्याचे दिसून येत आहे हे सर्व काम मजुरांच्या भरोशावर होत असून मजुरांना हे काम कोणाचे माहित नाही मात्र संबंधित ठेकेदार आपल्या व इंजिनियर मजुरांच्या भरोशावर काम करतात या कामावरती फिरवूनही पाहत नाहीत सदरील काम हे इस्टिमेट नुसार होत नसून हे काम किती रुपयाच आहे याची कुठलीस माहिती फलक लावण्यात आलेला नाही तर येथे इस्टिमेट सुद्धा उपलब्ध नाही लाखो रुपयाचे असलेले हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून सदरील कामावरती पाणीसुद्धा मारण्यात आलेले नाही ज्या ठिकाणी काम केले गेले त्या ठिकाणी परवानगी न घेता कित्येक सागवान झाडी पोकलँड च्या साह्याने तोडण्यात आली याची माहिती अजिंठा परिक्षेत्र विभागातील वन परिमंडळाला देण्यात आली परंतु त्यांनीही कुठलीच कारवाई आजवर हाती घेतलि नाही सावळद बारा हे गाव सोयगाव तालुक्यातील शेवटची गाव असून आणि डोंगर रांगेत असून मोठ्या प्रमाणावर नदी नाले झरणे असून येथे सिमेंट बांध अधिक प्रमाणात शासनाकडून राबवले जातात मात्र इंजिनीयरच्या व यांच्यावर अधिकाऱ्यांच्या मिली भगत मुळे हे सर्व कामे थातूरमातूर पद्धतीने करून आपले खिसे गरम करण्याचे काम हे लोक करतात या कामावरती निकृष्ट दर्जाची सिमेंट रेती वापरण्यात आली लोखंडाचे बिल काढले जाते मात्र यात असारी वापरले गेले नाही शासनाच्या बऱ्याच योजना गावोगावी येतात पण कागदोपत्री घोडे नाचवून कामाचे बिल काढण्यात येते या कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी गोकुळसिंग राजपूत व गावकऱ्याकडून व्यक्त होत आहे.

# सावळदबारा येथे डॉ. आंबेडकर जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील महावितरण कार्यालयात उपकार्यकारी अभियंता निरज बिदे सोयगाव यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरण कंपनीच्या कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार लाईनमन ज्ञानेश्वर घोडके, दिपक नेवारे, संदेश जाधव यांनी अर्पण करून अभिवादन केले. तसेच इतर वायरमन,अधिकारी, कर्मचारी वर्ग यांनी देखील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेला पुष्पसुमने वाहून अभिवादन केले. त्याचप्रमाणे इतर कर्मचारी उपस्थित होते.



# गजानन महाराजांनी भक्तिमार्गाने समाजाला दिशा दिली

## आ. जोरगेवार : दाताडा येथे नवनिर्मित संत गजानन महाराज मंदिर लोकार्पण, प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** श्री संत गजानन महाराज यांनी लोकांना भक्तिमार्गाचे महत्त्व पटवून सांगितले. ते सिद्धयोगी पुरुष होते. अद्वैत ब्रह्माचा सिद्धांत महाराजांच्या "गण गण गणात बोते" या सिद्धमंत्रात व्यक्त झाला आहे. ते एक महान संत होते. त्यांनी भक्तीमार्गाने समाजाला दिशा देण्याचे काम केले. आज त्यांच्या मंदिराचे लोकार्पण व प्राणप्रतिष्ठापणा करतांना आनंद होत असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

स्व. कु. साक्षी संजय बुरघाटे यांच्या स्मुतीप्रित्यर्थ दाताडा रोड वरील सावित्रीबाई फुले उद्याण येथे श्री. संत गजानन महाराज मंदिराचे बांधकाम करण्यात आले आहे. आज सोमवारी मंदिर लोकार्पण आणि प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी संजय बुरघाटे, अशोक मत्ते, श्याम घोपटे, माळी महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अरुण तिखे, चंद्रहारपाटील गोहोकार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जोरगेवार म्हणाले कि, गजानन महाराज हे अत्यंत परमोच्च स्थितीला पोहोचलेले ब्रह्मवेत्ते महान संत होते. भक्तांचा उद्धार करण्याची त्यांची स्वतःचीच एक विशिष्ट अशी शैली होती. काहीच न बोलता ते सर्व काही बोलून जात असा त्यांच्या भक्तांचा अनुभव होता. भक्तांवर असीम अशा कृपेचे छत्र धरून ते भक्तांच्या ह्रदयात घर करत असे. ''गण गण गणात बोते,'' हा त्यांचा आवडता मंत्र होता. ज्याचा ते अखंड ते जप करीत. या मंत्राशिवाय ते उभ्या आयुष्यात काहीही बोलले नाहीत. त्यांचे आज मंदिर उभे झाले आहे. हे एक मन शांती चे केंद्र ठरणार आहे. संजय बुरघाटे यांनी भाविकासांठी साकारलेल्या या मंदिरातुन भक्तीचा संचार होणार आहे. समाजातील दृष्ट शक्तीचा नाश होऊन सकारात्मकतेचा वास या परिसरात निर्माण होणार असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांची व श्री गजानन महाराज यांच्या भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# लहुजी शक्ति सेनेचा भाजपा-महायुतीला पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मातंग समाजाच्या मागण्यांसाठी लढणा-या लहुजी शक्ति सेनेने सोमवारी भारतीय जनता पार्टीचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमामध्ये लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि महायुती ला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला महायुतीचे समन्वयक आ.प्रसाद लाड, भाजपा प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, लहुजी शक्ति सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे, विष्णू कसबे, सचिन क्षीरसागर आदी उपस्थित होते. आ.शेलार यांनी लहुजी शक्ति सेनेच्या नेते आणि पदाधिका-यांचे मोदी परिवारात स्वागत करत पाठिंब्याबद्दल लहुजी शक्ति सेनेचे आभार मानले. आ.शेलार म्हणाले की मोदींचा परिवार म्हणजे वंचितांचा, गरीबांचा परिवार आहे. या परिवारात सहभागी झालेल्या प्रत्येक घटकाच्या प्रश्नांची तड लावण्यासाठी पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी अविरत झटत आहे.

मातंग समाजाच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम करणारी लहुजी शक्ति सेना आज महायुतीमध्ये सामील झाल्याने आमचे हात अधिक मजबूत झाले आहेत. या समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणून समाज विकास करण्यासाठी भाजपा पूर्णपणे वचनबद्ध असल्याचे ही आ.शेलार म्हणाले. याप्रसंगी बोलताना लहुजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलासदादा खंदारे म्हणाले की उपेक्षित, वंचित, दुर्बल घटकांना न्याय देण्याचे काम फक्त भारतीय जनता पार्टी करू शकते, असा विश्वास असल्यानेच आमच्या संघटनेने भाजपा ला बिनशर्त पाठिंबा दिला आहे. याआधीही अण्णाभाऊ साठे स्मारकाचे रखडलेले काम सुरू करून स्मारकासाठी 300 कोटींपेक्षा अधिक निधी देणे, बंद झालेल्या अण्णाभाऊ साठे महामंडळासाठी निधी देणे, अण्णाभाऊ साठे संशोधन, प्रशिक्षण संस्थेचे निर्माण आदी पुढाकार घेऊन भाजपाने मातंग समाजाप्रतीची त्यांची बांधिलकी दर्शवली असल्याचे ही ते म्हणाले. महायुतीच्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी आमची संघटना जीवाचे रान करेल असा शब्द यावेळी त्यांनी दिला.





# महाविकास आघाडीची पैठण शहर व आपेगाव गट आढावा बैठक संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जालना लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी, इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ पैठण शहर व आपेगाव जि. प. गट पदाधिकारी आढावा बैठक माजी मंत्री अनिल पटेल, दत्ता गोर्डे, मा.आमदार संजय वाघचौरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पैठण येथे आढावा बैठक संपन्न झाली.

या बैठकीमध्ये गावागावातील बुथ, विविध विषयावर चर्चा करत महाविकास आघाडी, इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ.कल्याण काळे यांना जास्तीत जास्त मताधिक्क्याने निवडून आणण्याचा संकल्प करण्यात आला.

याप्रसंगी माजी राज्यमंत्री अनिल पटेल,माजी आमदार संजय वाघचौरे, मा.आमदार नामदेव पवार,विलासबापु औताडे, कांचनकुमार चाटे, कॉंग्रेस प्रदेशचे रविंद्र काळे, शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता गोर्डे, काग्रेस तालुकाध्यक्ष विनोद तांबे, डॉ.गुलदाद पठाण, अजय परळकर, निमेश पटेल, उमेश पंडुरे, आपेगाव गटाचे ज्ञानेश्वर कापसे, अशोक औटे, बद्रीनाथ भुमरे, अनिल घोडके, राखीताई परदेशी, अंजली बांगर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ज्ञानदेव मुळे, पैठण तालुका व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उगलेसह पैठण शहर व आपेगाव जि.प.गटातील कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, (शरद पवार) शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले विद्यालयाचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवी मध्ये शिक्षण घेतअसलेले विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक परीक्षा (NMMS) परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कृष्णा अंकुश जाधव, शंतनू आश्रुबा राऊत, सार्थक भीमराव राऊत, सचितानंद राजेंद्र कुंभार, अभिनव जनक वाघमारे यांचा समावेश आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक पठाण जे. एन. पर्यवेक्षक काकासाहेब मुंडे तसेच मार्गदर्शक शिक्षक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.





# पहिले पाऊल अभियान प्रवेशोत्सव उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी येथे शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सन 2024-25 शैक्षणिक वर्षातील इयत्ता पहिलीच्या नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पहिले पाऊल प्रवेशत्सव अभियान मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या प्रसंगी विद्यार्थ्यांना उन्हापासून संरक्षण होण्यासाठी टोपी, फळांचा राजा केशर आंबा, गुलाब पुष्प,फुगे, शैक्षणिक साहित्य, केळी देऊन स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाची सुरूवात माता पालकांच्या शुभहस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन व फित कापून करण्यात आले.विविध टेबलावर शैक्षणिक साहित्य ठेवून विद्यार्थ्यांच्या नोंदी करण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रस्तावित उपक्रमशिल शिक्षक धनंजय गव्हाणे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरोजिनी पोते व सुरेखा भावले यांनी परिश्रम घेतले.

# नरेंद्र मोदी हेच उमेदवार समजून मतदान करा : फडणवीस यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** यंदाची निवडणूक ही देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. ही निवडणूक विश्वगौरव विकासपुरूष नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी आहे. नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी भाजपा उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करा. विकसित भारताचा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी नरेंद्र मोदींच्या पारड्यात मोठ्या संख्येने मतांचे दान टाका, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी सोलापूर येथे व्यक्त केला. सोलापूर मतदारसंघातील भाजपा - महायुतीचे उमेदवार आ.राम सातपुते व माढा मतदारसंघातील उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना झालेल्या सभेत श्री.फडणवीस बोलत होते. यावेळी खा. जयसिद्धेश्वर महास्वामी, आ.सुभाष देशमुख, आ.विजकुमार देशमुख, आ.बबनदादा शिंदे, आ.जयकुमार गोरे, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.संजय शिंदे, आ.समाधान आवताडे, आ.यशवंत माने, आ.शहाजीबापू पाटील, माजी आ.प्रशांत परिचारक आदी मंचावर उपस्थित होते. यावेळी फडणवीस म्हणाले की एनडीए म्हणजे विकासाच्या गाडीचे पॉवरफुल इंजिन असून त्याला आमच्या घटक पक्षांचे डबे जोडले गेले आहेत. या प्रत्येक डब्यात दुर्बल, वंचित, आदिवासी, अल्पसंख्याक, महिला, शेतकरी या सर्वांसाठी जागा आहे. मात्र याउलट विरोधकांकडे 26 पक्ष असून प्रत्येक नेताच स्वतःला इंजिन समजतो त्यामुळेच त्यांच्या इंजिनाला डबेच नसल्याने त्यात सर्वसामान्यांना जागाच नाही, त्या इंजिनात केवळ त्यांचा परिवार बसणार आहे अशी खोचक टिप्पणी त्यांनी केली. कमळाचे बटन दाबले की थेट मत उमेदवाराला नव्हे तर मोदींना जाईल असे सांगताना विरोधकांचे मात्र प्रत्येक मत हे राहुल गांधींना जाणार आहे हे अधोरेखित केले. 25 कोटी जनता दारिद्र्य् रेषेच्या वर, 20 कोटी लोकांना पक्की घरे, 50 कोटी जनतेसाठी शौचालये, 55 कोटींना गॅस कनेक्शन्स, 60 कोटी लोकांच्या घरात पिण्याचे पाणी, 55 कोटी जनतेला आयुष्मान योजनेमुळे 5 लाखांपर्यंत मोफत उपचार हे सगळे स्वप्नवत वाटणारे कार्य मोदी सरकारने करून दाखवले. कोट्यवधी लाभार्थींचे आशीर्वाद आज मोदींच्या पाठीशी असल्याने मोदींच्या केसालाही धक्का लागणार नाही असा इशारा ही त्यांनी विरोधकांना दिला. मागच्या 10 वर्षांत देशाची अर्थव्यवस्था मोदी सरकारमुळे जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था बनली आहे. अर्थव्यवस्था मजबूत असेल तरच पायाभूत सुविधा विकास आणि विशेषत्वाने गरीब कल्याणाचा अजेंडा प्रभावीपणे राबवता येतो असे फडणवीस म्हणाले.

# डॉ.बाबासाहेबांच्या कार्याचा आदर्श युवा पिढीने घ्यावा : उभेदळ

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील आदर्शगाव सुरेशनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. आंबेडकर यांचे कार्य समाजाला आदर्शवत असे असून त्यांच्या कार्याचा आदर्श युवा पिढीने घ्यावा असे आवाहन सुरेशनगर ग्रामपंचायतचे मार्गदर्शक कल्याणराव उभेदळ यांनी यावेळी बोलताना केले.

सुरेशनगर ग्रामपंचायतमध्ये झालेल्या जयंती कार्यक्रम प्रसंगी सरपंच सौ. शैलाताई उभेदळ यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यावेळी झालेल्या आंबेडकर जयंती प्रसंगी गावचे मार्गदर्शक कल्याणराव उभेदळ, सरपंच सौ.शैलाताई उभेदळ, उपसरपंच नाथा बाबर, विठ्ठल पाषाण, भागचंद पाडळे, माजी सरपंच भगवान दळवी, भारतीय बौद्ध महासभेच्या तालुकाध्यक्षा मिराताई जाधव, अशोक खंडागळे, सतीश क्षीरसागर, विनोद निकाळजे, ग्रामपंचायत सदस्य दयानंद खिलारे, मंडलाधिकारी भालेराव, भास्कर लिहिणार, सचिन मगर, रामा खंडागळे, कल्याण दळवी, दिलीप शेटे, अर्जुन दळवी, अविनाश उभेदळ, भिवसेन रंधवे, बाबासाहेब खंडागळे, लक्ष्मण महाराज चव्हाण, अमोल खंडागळे, सचिन शेगर,भीमा चव्हाण, सुनीता उभेदळ, दौपदा जाधव उपस्थित होते







# महावितरणमध्ये भीमजयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलात छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समितीतर्फे कर्मचारी व पाल्यांसाठी विविध स्पर्धा, व्याख्यान, मशाल रॅली, रक्तदान शिबिर अशा विविध उपक्रमांनी डॉ.आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे प्रभारी मुख्य अभियंता शांतीलाल चौधरी होते. यावेळी मुंबई मुख्यालयातील मुख्य अभियंता भुजंग खंदारे, व्याख्याते ॲड.अभय टाकसाळ, कार्यकारी अभियंता सतीश खाकसे, समितीचे सचिव सुनील पावडे, कोषाध्यक्ष संदीप पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. वरिष्ठ तंत्रज्ञ ज्ञानदेव भालेराव व त्यांच्या संचाने भीमगीते गाऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

पाल्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांची वेशभूषा साकारली. कर्मचारी व पाल्यांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. वक्तृत्व स्पर्धेत बालगटात अद्विक अथरगण -प्रथम, अद्विक तायडे-द्वितीय, तर शालेय गटात शाकीब खान- प्रथम, लविश मुळे-द्वितीय, यश बोर्डे-तृतीय, शेख अरमान, प्रचिती पंडित, राजलक्ष्मी सूर्यवंशी, कृष्णा सूर्यवंशी, वैष्णवी रोडगे, निबंध स्पर्धेत लहान गटात यश बोर्डे-प्रथम, अद्विक अथरगण-द्वितीय, शालेय गटात रूपाली शेजूळ-प्रथम, शाम पवार-द्वितीय, रिया भवर व कृष्णा सूर्यवंशी-तृतीय, प्रौढ गटात अभय एरंडे व रमेश शिंदे-प्रथम, भानुदास शेवाळे-द्वितीय, डॉ.सुरेखा भालशंकर-तृतीय, काव्य स्पर्धेत लहान गटात यश बोर्डे-प्रथम, शालेय गटात राजलक्ष्मी सूर्यवंशी-प्रथम. प्रौढ गटात भानुदास शेवाळे-प्रथम, रमेश शिंदे व अभय एरंडे-द्वितीय व सुधाकर जायभाये-तृतीय तर वेशभूषा स्पर्धेत यश बोर्डे-प्रथम, स्पृहा गायकवाड- द्वितीय, अद्विक तायडे-तृतीय यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण विलास चांदणे व रमेश जोशी यांनी केले. भीमजयंतीनिमित्त सकाळी विद्यापीठातील बाबासाहेबांचा पुतळा ते मिलकॉर्नरवरील महावितरणच्या परिमंडल कार्यालयापर्यंत ज्ञानज्योती मशाल यात्रा काढून वीजचोरीचे दुष्परिणाम, वीज बचत, वीजबिल भरण्याचे महत्त्व याबाबत महावितरणचे कर्मचारी नारायण खरात, संजय शाहीर, विजय मेटे, राहुल मुळे, अजित साळवे, शैलेश चांदणे, विनायक देवकर, विशाल वानखेडे, पंकज तायडे, प्रेम चव्हाण, सुनील राठोड, अशोक कात्रे, विनोद तित्तर, विवेकानंद बांगर, संदीप बोर्डे, दीपक दांडगे, सुनील पावडे, मनोज पगारे, लविश मुळे, अद्विक तायडे यांनी जनजागृती केली.

यावेळी प्रमुख वक्ते ॲड.अभय टाकसाळ म्हणाले की, डॉ.आंबेडकर हे दीनदलित, कामगार, शेतकरी, महिलांना न्याय देणारे महापुरुष होते. त्यांनी लिहिलेल्या संविधानाप्रमाणे वाटचाल करण्याची आपणा सर्वांची जबाबदारी आहे. मुख्य अभियंता भुजंग खंदारे म्हणाले की, महापुरुषांनी प्रत्येक चांगल्या गोष्टींची सुरुवात स्वतःपासून केली. हाच विचार बाबासाहेबांनी कायद्यात मांडला. स्वातंत्र्य, समानता, न्याय, बंधुता ही मूल्ये संविधानातून त्यांनी रुजवली. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी मुख्य अभियंता शांतीलाल चौधरी म्हणाले की, बाबासाहेबांनी भारतातील विद्युत क्षेत्राच्या विकासाची पायाभरणी केली. त्यांच्या विचारांनुसार महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना सर्वोत्कृष्ट सेवा देण्यासाठी कार्यरत असले पाहिजे. जयंती उत्सव समितीने यावर्षी राबवलेल्या विविध उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. प्रास्ताविक समितीचे सचिव व विधी अधिकारी सुनील पावडे यांनी केले. रमेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.कृष्णा काळदाते यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. राजेश चांदणे यांनी आभार मानले.

# व्यक्तिमत्त्व विकासावर नगरमध्ये 20 एप्रिलपासून 4 दिवस कार्यशाळा

## मानसोपचार तज्ज्ञ डॉ. श्रीकांत कुलांगे मार्गदर्शन करणार

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** व्यक्तिमत्व विकासाला आज स्पर्धेच्या युगात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे , व्यक्तिमत्त्वात विविध टप्प्यावर होणारे बदल कधी चांगले तर कधी घातक सुद्धा असतात, ज्यावेळी आपल्यात चांगले बदल होतात त्यालाच आपण व्यक्तिमत्व विकास झाला असे म्हणतो.



मन, भावना, शरीर, बुद्धी, सामाजिक जाणीव यांचा विकास झाला, तर आपले व्यक्तिमत्व संतुलित आणि संपन्न होईल . दैनंदिन व्यवहारांमध्ये स्वतःला इतरांच्या तुलनेत सरस ठेवण्यासाठी व्यक्तिमत्व विकासाची गरज आहे यासाठी "श्रीं एज्युकेशन ग्रुप" मार्फत 4 दिवसाचा दररोज 8 तास , "व्यक्तिमत्व विकास" ही कार्यशाळा आयोजित केली आहे या कार्यशाळेत व्यक्तिमत्व विकास टप्प्याटप्प्याने शिकवला जाईल. यामध्ये व्यक्तींच्या विविध व्यक्तिमत्वा संबंधित मानसशास्त्रीय चाचण्या घेऊन प्रत्येकाला त्यांच्यात नेमके कुठले बदल करणे आवश्यक आहे ते सांगण्यात येईल. ही कार्यशाळा 20, ते 23 एप्रिल रोजी श्रीम एज्युकेशन ग्रुप ,45, ओम बेकर्स मागे, किर्लोस्कर कॉलनी, गुलमोहर रोड, सावेडी अहमदनगर या ठिकाणी घेण्यात येईल यासाठी 16 ते 60 हा वयोगट असून यामध्ये विद्यार्थी युवक व महिला सहभागी होऊ शकतात त्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नामवंत मानसोपचार तज्ज्ञ डॉ श्रीकांत कुलांगे यांनी केले आहे कुलांगे स्वतः आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक वर्षापासून विविध प्रकारच्या कार्यशाळा आयोजित करत आहेत पुणे व नगर मधील अनेक विद्यार्थ्यांना व महिलांना याचा फायदा झाला आहे, नगरसेवक शहर व परिसरातील गरजूंना याचा लाभ होऊ शकतो अधिक माहिती व प्रवेशासाठी प्रवेशासाठी 989042 0209/8080856676/8055081555 या नंबर वर संपर्क साधावा.

# सुट्यांमुळे परिवहनतर्फे जादा बससेवेचे नियोजन

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** उन्हाळ्याच्या सुट्यांमुळे गावी जाण्यासाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने एप्रिल ते जून या कालावधीत जादा बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे.राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने प्रवाश्यांच्या सेवेसाठी वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. इलेक्ट्रिक बस, शिवनेरी, शिवाई यांसह इतर साध्या बस प्रवाशांच्या सेवेत आहेत. शाळांना सुट्ट्या लागल्यावर गावी जाण्यासाठी होणाऱ्या गर्दीमुळे बससेवा अपुरी पडते. वेगवेगळ्या आगारातून राज्याच्या कानाकोपऱ्यात जाण्यासाठी बससेवा सुरू आहे. नाशिक (एक) आगारातून चोपडा, धुळे, नाशिक (दोन) आगारातून नंदुरबार, जळगाव, मालेगाव आगारातून छत्रपती संभाजीनगर, सटाणा आगारातून नाशिक, नंदुरबार, सिन्नर आगारातून नाशिक, अहमदनगर, शिर्डी, नांदगाव आगारातून पाचोरा, छत्रपती संभाजीनगर, इगतपुरी आगारातून धुळे, चोपडा, लासलगांव आगारातून नाशिक, पेठ येथून अहमदनगर, शिर्डी, येवला येथून छत्रपती संभाजीनगर, पिंपळगांव नंदुरबार, शिरपूर, पाचोरा, धुळे येथे जाण्यासाठी जादा बस फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे.

# रामनवमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिर्डी संस्थानकडून विविध सुविधा

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शहरात रामनवमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर साईबाबा संस्थानच्या माध्यमातून एक लाख ७३ हजार सभासदांना निमंत्रण पत्रिका पाठवण्यात आल्या असून १६ ते १८ एप्रिल या कालावधीत ७८पालख्या या विविध ठिकाणाहून साई दर्शनासाठी पायी पदयात्री येणार आहेत त्यांच्या सेवेसाठी एक लाख १६ हजार चौरस फूट कापडी मंडपाची ठिकाणी उभारणी करण्यात आली असून निवास व्यवस्थेसाठी देखील ५६ हजार ५०० चौरस फूट मंडप विविध ठिकाणी उभारण्यात आले आहे त्याबरोबरच साई मंदिर परिसरात श्रीराम प्रभूचा भव्य देखावा देखील उभारण्यात आला असून येणाऱ्या साईभक्तांना साईबाबा संस्थान कडून मोफत बुंदी पाकिटे दिले जाणार असून त्यासाठी दोन लाख ७० हजार पाकिटे तयार करण्यात आले असून सहा ठिकाणी काउंटर उभारण्यात आले आहे त्याबरोबरच साई दर्शनासाठी येणारे साईभक्त मोठ्या प्रमाणावर प्रसाद लाडू घेत असल्यामुळे त्यासाठी पाच लाख तीस हजार प्रसाद लाडू पाकीट तयार करण्यासाठी येत असून १४ ठिकाणी लाडू काउंटर सुरू करण्यात आले आहे या तीन दिवसाच्या काळामध्ये दोन लाख लोकांची भोजन व्यवस्था करण्यात आली असून तीन दिवस वेगवेगळ्या पद्धतीने गोड भोजन दिले जाणार आहे त्याबरोबरच साई भक्तांना कुठे कुठल्याही प्रकारे आरोग्याची अडचणी येऊ नये म्हणून विविध ठिकाणी प्रथम उपचार केंद्र देखील उभारण्यात आले आहे त्याबरोबरच साईबाबा संस्थानच्या विविध ठिकाणी जाण्यासाठी साई भक्तांसाठी जागा बशीची व्यवस्था देखील करण्यात आली आहे त्याबरोबरच साई भक्तांच्या सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून साईबाबा संस्थान सुरक्षा व्यवस्था शिर्डी पोलीस यांच्या माध्यमातून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पंधराशे सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे रामनवमीच्या पार्श्वभूमीवर सोमवार दिनांक १५ एप्रिल रोजी मोठ्या प्रमाणावर साईदर्शनासाठी गर्दी सुरुवात झाली असून ठीक ठिकाणाहून येणाऱ्या पालख्याची देखील आगमन होत असून शिर्डी ग्रामस्थांच्या वतीने ठिकठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात येत असून अनेक ठिकाणी साई भक्तांनी चहापान नाश्ता भोजन याची सुविधा देखील केलेली दिसून येत आहे उत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सह विविध राज्यातून साईभक्त मोठ्या प्रमाणावर येत असतात त्यांच्या सुविधेसाठी साईबाबा संस्थान मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करत असल्याची माहिती साईबाबा संस्थानचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे यांनी दिली तसेच उपविभागीय अधिकारी शिरिष वमणे पोलीस निरीक्षक रामचंद्र कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# नाशिकमध्ये होणार आसाम रायफल्स माजी सैनिक संघ केंद्र

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** आसाम रायफल्स वेटरन्स गत महिन्यात साजरा झाला. त्यानंतर आता आसाम रायफल्स महानिदेशालय, आसाम रायफल्स पूर्व सैनिक संघाच्या सहयोगाने, महाराष्ट्रातील आसाम रायफल्स माजी सैनिक संघाच्या नवीन आसाम रायफल्स माजी सैनिक संघ (ARESA) केंद्राचे उद्‌घाटन होत आहे. हे महाराष्ट्रातील पहिले ARESA केंद्र आहे ज्यात 107 पूर्व सैनिक आहेत, राज्यातील आसाम रायफल्स वेटरन्सला कल्याण सुविधांची आणि समर्थन सेवांचा पुरवठा करण्यास हे केंद्र समर्पित असणार आहे.

लेफ्ट. जनरल प्रदीप चंद्रन नायर, पी वी एस एम, ए वी एस एम, वाय एस एम, पीएच.डी,महा निदेशक आसाम रायफल्स यांच्या हस्ते नवीन केंद्राचे 21 एप्रिल 2024 रोजी उद्‌घाटन होणार आहे. यानंतर माजी सैनिक रॅलीचे आयोजनही करण्यात आले आहे. आसाम रायफल्स मध्ये सेवा केलेल्या वेटरन्सच्या योगदानांचा समर्थनासाठी याचे आयोजन करण्यात आले आहे. लेफ्टनंट जनरल प्रदीप नायर हे मूळ पुण्याचे नागरिक आहेत आणि त्यांचे शिक्षण सातारा सैनिक शाळेमध्ये झालेले आहे.

ARESA केंद्र माजी सैनिकांनी स्वतः नियोजित केलेले आहेत, ज्यामुळे माजी सैनिकांच्या विशेष नाशिक केंद्राला 111 आसाम रायफल्सच्या माजी सैन्य कर्मचार्‍यांच्या आणि वीर नारींच्या आवश्यकतांसाठी परवानगी दिली आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने माजी सैन्य कर्मचार्‍यांना त्यांचे अनुभव सांगण्याची आणि , जुन्या सहकर्मींसह पुन्हा संपर्क साधण्याची संधी मिळणार आहे. देशभरात एकूण 34 ARESA केंद्रे आसाम रायफल्सच्या एक लाखाहून अधिक माजी सैनिकांना मदत करतात.





# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती फुलंब्री शहरासह ग्रामीण भागात उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरासह ग्रामीण भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. फुलंब्री येथील नगरपंचायत परिसरात असणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याला जयंतीनिमित्त रविवारी दुपारी राजकीय पदाधिकाऱ्यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यामध्ये आमदार हरिभाऊ बागडे, इफकोचे संचालक त्र्यंबकराव शिरसाट, माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाठ, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अनुराधा चव्हाण, राजू प्रधान भाजप शहराध्यक्ष योगेश मिसाळ, भाजपा शहराध्यक्ष युवा मोर्चा वाल्मीक जाधव, रवींद्र काथार,यांच्यासह विविध मान्यवरांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता फुलंब्री शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये भीम सैनिकांचा मोठा उत्साह दिसून आला यामध्ये महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.

# बबलू कराळे यांच्या शोधनिबंधाला राष्ट्रीयस्तरीय सेमिनारमध्ये पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्टडी सेंटर येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरीय सेमिनार मध्ये बबलू विनायकराव कराळे यांनी सादर केलेल्या धर्मनिरपेक्षतेला धोका आणि आव्हाने या शोधनिबंधाला राष्ट्रीय स्तरीय सेमिनारमध्ये पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. बबलू विनायकराव कराळे हे ISO जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा येथे सहाय्यक शिक्षक या पदावर कार्यरत आहे. त्यांनी मराठी विषयाकरिता सादर केलेल्या शोधनिबंधाला पुरस्कार मिळालेला आहे. बबलू कराळे यांचे एकूण सात पुस्तक प्रकाशित असून त्यांचे लेखन राज्यस्तरीय राष्ट्रीय स्तरीय आणि आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांमधून मासिकांमधून नियतकालिकांमधून, नामवंत सर्वच दिवाळी अंकांमधून शैक्षणिक, सामाजिक, ललित वैचारिक लेखन प्रसिद्ध झालेले आहे. त्याकरिता सर्व स्तरावरून त्यांचे अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. गावचे सरपंच प्रथम नागरिक मा. नारायणराव बोरेकार, केंद्रप्रमुख श्रीकृष्ण उघडे, उच्च श्रेणी मुख्याध्यापिका कु. शीला सोळंके, कल्पना चौधरी, बबीता पंडित, किरण साकरकार, रश्मी पांनझाडे, दिनकर राऊत, रतिराम मावस्कर सर, यांनी अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.



# वीज कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरण ग्रामीण-२ उपविभागातील तंत्रज्ञ, यंत्रचालक, कर्मचारी, अभियंता यांच्यासाठी प्रादेशिक प्रशिक्षण व सुरक्षा केंद्रातर्फे कार्यशाळा घेण्यात आली.

अतिरिक्त कार्यकारी अभियंता विजय सुरडकर, सहायक विद्युत निरीक्षक मोहन पोफळे, सहायक अभियंता रामदास डोंगरे, विद्युत निरीक्षक कार्यालयातील शाखा अधिकारी जयश्री तरोले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी तज्ज्ञांनी सुरक्षा साधने न वापरल्याने आणि अपुरे ज्ञान यामुळे विद्युत वाहिनीवर काम करताना होणारे अपघात, त्याचे दुष्परिणाम याबद्दल सोदाहरण मार्गदर्शन केले. सुरक्षा साधने वापरून अपघातमुक्त सेवा देण्याचा सल्ला त्यांनी दिला. यावेळी उपविभागातील तंत्रज्ञ, यंत्रचालकांचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावण कोळनूरकर यांनी केले. आभार रमेश शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपविभागातील अभियंता, तंत्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



# महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे भीमजयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील दरेगाव येथील महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनियर कॉलेज येथे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती निमित्ताने मुख्याध्यापक श्री प्रकाश वेताळ यांनी प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून आपले विचार मांडले.

आधुनिक भारताचे प्रमुख निर्माते, भारतीय संविधान वं राज्यघटनेचे शिल्पकार, स्वातंत्र्यपूर्व भारताचे श्रम, रोजगार, सार्वजनिक बांधकाम, उर्जा, जलसंपदा व विमान वाहतूक मंत्री आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, युगप्रवर्तक संपादक, मुकनायक संपादक, जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ, थोर जलनीतिज्ज्ञ, शोषण आणि अन्यायाला बळी पडलेल्या शेतकरी - शेतमजूर - कामगार व बहुजन समाजाचे उद्धारक आणि बौद्ध धम्माच्या समता व मानवतावादी आचार-विचारांचे पुनरुज्जीवन घडविणारे महान द्रष्टे, क्रांती सूर्य, विश्वरत्न, भारतरत्न, महामानव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंत्ती निमित्त त्यांच्या थोर विचारांना विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# शिर्डीत भीषण अपघात: एका तरुणाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** साईबाबा संस्थान व शिर्डी ग्रामस्थांकडून श्रीरामनवमी उत्सवाची जोरदार तयारी सुरू आहे. दरम्यान काल, रविवारी रात्री शिर्डीतुन जाणाऱ्या नगर-मनमाड महामार्गावर विद्युत रोषणाईचे काम करणा या एका तरुणाला वाहनाने दिलेल्या धडकेत एका तरुणाचा मृत्यु झाला. प्रविण गवांदे असे या बत्तीस वर्षीय तरुणाचे नाव आहे. तो अस्तगाव येथील रहिवाशी आहे. काल, रविवारी रात्री साडेदहाच्या सुमारास नगर-मनमाड मार्गावरील डी मार्ट मॉलसमोर हा भयानक अपघात झाला. रामनवमी उत्सवनिमित्त लाईटिंगचे काम सुरू असताना रस्त्यावरील शिर्डी नगरपरिषदेच्या विद्युत विभागाच्या क्रेन वाहनाला भरधाव वेगाने आलेल्या चारचाकी वाहनाने धडक दिल्याने हा अपघात झाला. या दुर्दैवी अपघातात प्रविण गवांदे यांचा जागीच मृत्यू झाला. अन्य चार जण जखमी झाले आहेत.

शिर्डीत रामनवमी उत्सवानिमित्ताने सर्वत्र विद्युत रोषणाई करण्याचे काम सुरू आहे. नगर-मनमाड मार्गावरही या प्रकारे काम सुरू होते. त्यात गंवादे हे या कामावर असतांना दृदैवी अपघात झाला.

खाजगी ठेकेदाराच्या माध्यमातुन काम करणा या गवांदे यांच्या ठेकेदाराने यापुर्वी साईमंदिरावर व परिसरात अनेकदा विनामुल्य विद्युत रोषणाईचे काम केले आहे. त्या कामांचे नेतृत्व नेहमी गंवादे यांच्याकडे असे. आपल्या मनमिळावू स्वभाव व सेवाभावी वृत्तीमुळे शहरात परिचित असलेल्या गवांदे यांच्या मृत्युने शिर्डीत शोकाकुल वातावरण आहे.




# शिवसेनेच्या महिला आघाडी प्रमुख मीराताई गुंजाळ यांच्या वतीने वृद्धाश्रमाला किराणा साहित्य भेट

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** खडका रस्त्यावर असलेल्या शरणपूर वृद्धाश्रमाला किराणा साहित्य भेट देऊन शिवसेनेच्या महिला आघाडी प्रमुख सौ.मीराताई गुंजाळ यांनी आपला वाढदिवस आजी आजोबांच्या समवेत साजरा केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ विधी तज्ञ ॲड. के. एच. वाखुरे सर हे होते तर शिंदे गट शिवसेनेचे भाऊसाहेब वाघ,महिला आघाडी तालुका प्रमुख व मीरा फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ.मीराताई गुंजाळ,बंडूभाऊ शिंदे,अभिजित दारकुंडे, अंबादास रोडे यावेळी उपस्थित होते. यावेळी किराणा साहित्य वृद्धाश्रम चालक रावसाहेब मगर,संतोष मगर,सौ.ज्योतीताई मगर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले.वृध्दाश्रम संपर्क प्रमुख यांनी वृध्दाश्रम उपक्रमाची माहिती दिली.यावेळी वृद्धाश्रमातील आजी आजोबांच्या हस्ते सौ.मीराताई गुंजाळ यांचा वाढदिवसाच्या निमित्ताने बुके व शाल घालून सन्मान करण्यात आला. वृद्धाश्रमासाठी लोक सहभागातून योगदान देण्यासाठी मी प्रयत्न करेन अशी ग्वाही देत सौ.गुंजाळ यांनी मला माझी आजी भेटल्याचा आनंद सर्व आजींना भेटून झाला असल्याची भावना यावेळी बोलताना व्यक्त केली. वृद्धाश्रमासाठी लागणाऱ्या नियोजित जागेसाठी पाठपुरावा करू व त्या नंतर वृध्दाश्रमाला शासकीय अनुदान कसे मिळेल यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही भाऊसाहेब वाघ व ॲड.के. एच. वाखुरे यांनी यावेळी बोलताना दिली.

# फुले आंबेडकरी चळवळीचे शिलेदार व्हावे : डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**लोणंद :** महात्मा फुले यांनी या देशात सामाजिक समतेचा नवा विचार आपल्या वाणी, लेखणी आणि कृतीतुन रूजविला. माणसाचे माणुसपण नाकारणाऱ्या सर्व प्रकारच्या दृष्ट रुढी प्रथा परंपरांना त्यांनी विरोध केला.स्त्री स्त्रीयांच्या शिक्षणासाठी त्यांनी पुढाकार घेऊन स्त्रीयांना गुलामीतून मुक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना गुरू माणून त्यांनी केलेल्या मानवमुक्तीच्या लढ्याचे नेतृत्व केले. फुले आंबेडकरी चळवळीने विषमतेच्या विरोधात बंड करून मानवी स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले त्यामुळे आज देशात स्वातंत्र्य, समता न्याय बंधुतेची ग्वाही देणारे संविधान आज देशात आहे. ही फुले आंबेडकरी विचारांची देण आहे.ही चळवळ समजून घेऊन तीला पुढे नेण्यासाठी या चळवळीचे शिलेदार बनावे असे आवाहन डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण, विभागप्रमुख बार्टी यांनी अध्यक्षीय भाषणातून बोलतांना व्यक्त केले.क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त समता सप्ताह अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.प्रमुख पाहुणे म्हणून सत्यशोधक विचारवंत बापुराव घुंगरगावकर हे होते.विभागप्रमुख अनिल कारंडे, संजय कदम, लेखाधिकारी योगिता झानपुरे आदी उपस्थित होते. दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजी बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त लंडन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभागी झाले आहेत. बार्टी मुख्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले, भारतीय राज्यघटनेचे निर्माते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण, श्रीमती स्नेहल भोसले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विभागप्रमुख अनिल कारंडे, संजय कदम, शुभांगी पाटील, यांनीही अभिवादन केले. बार्टी मुख्यालय ते डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा , जिल्हाधिकारी पुणे या मार्गाने समता रॅली काढण्यात आली या रॅलीचा समारोप डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करुन करण्यात आला.बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान निर्मितीमध्ये असलेल्या योगदानाची माहिती संविधान जनजागृती अभियानाद्वारे दिली .मान्यवरांचा सन्मान भारतीय राज्यघटनेची प्रत भेट देऊन करण्यात आला. कार्यक्रमांच्या समारोप सत्रात युपीएससी निवासी प्रशिक्षण केंद्र येरवडा पुणे येथील विद्यार्थ्यांना विभागप्रमुख डॉ चव्हाण यांनी आपल्या परिस्थितीवर मात करून विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे असे मत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.प्रमुख पाहुण्यांचा परिचय सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक विकास गायकवाड यांनी करून दिला. सूत्रसंचालन रामदास लोखंडे यांनी केले. आभार प्रकल्प व्यवस्थापक डॉ. प्रेम हनवते यांनी मानले. या प्रसंगी बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# उबाठा गटाच्या माजी नगरसेविका अश्विनी मते यांचा शेकडो समर्थकांसह भाजप प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उबाठा गटाच्या माजी नगरसेविका अश्विनी मते यांनी सोमवारी आपल्या शेकडो समर्थकांसह भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या प्रवेश कार्यक्रमाला मुंबई भाजपा अध्यक्ष आ.आशिष शेलार, प्रदेश भाजपाचे कोषाध्यक्ष व ईशान्य मुंबई मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आ.मिहीर कोटेचा, आ.राम कदम, खा.मनोज कोटक, अमरजीत मिश्रा, प्रभाकर शिंदे, पुणे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य आशाताई बुचके, भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.

मुंबई भाजपा अध्यक्ष आ.आशिष शेलार यांनी अश्विनी मते व त्यांच्या समर्थकांचे भारतीय जनता पार्टी मध्ये स्वागत केले. यावेळी प्रदेश भाजपाचे कोषाध्यक्ष व ईशान्य मुंबई मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आ.मिहीर कोटेचा म्हणाले की, अश्विनीताई या सामान्य माणसाची कामे मार्गी लावण्यासाठी धडपड करणाऱ्या लोकप्रतिनिधी आहेत. नरेंद्र मोदी यांच्या गरीब कल्याणाच्या कार्यक्रमाला साथ देण्यासाठी अश्विनी मते यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. अश्विनी मते यांच्या भाजपा प्रवेशामुळे मिहीर कोटेचा यांचे मताधिक्य आणखी वाढणार आहे, असे ईशान्य मुंबई मतदारसंघाचे विद्यमान खा.मनोज कोटक यांनी सांगितले.

उबाठा गटात काम करताना आपल्याला विकास कामे करताना त्रास होत होता म्हणून आपण भारतीय जनता पार्टीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला, असे अश्विनी मते यांनी सांगितले. अश्विनी मते यांच्यासमवेत उबाठा गटाच्या विनायक कोरडे, बाळू सोमटोपे, मलंग शेख, सुरेश मोरे, अर्जुन चौरसिया, महावीर नाईक, महेंद्र सोनावणे या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

# अखिल भारतीय मराठा महासंघाचा भाजपा-महायुतीला पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठा समाजाच्या न्याय्य हक्कासाठी झगडणाऱ्या अखिल भारतीय मराठा महासंघाने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी आणि महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. भारतीय जनता पार्टीचे मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष दिलीप जगताप यांनी ही घोषणा केली. महायुतीचे समन्वयक आ. प्रसाद लाड, भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, मराठा महासंघाचे पदाधिकारी राष्ट्रीय उपाध्यक्ष संतोष ननावटे,संभाजी दहातोंडे, राज्य संपर्कप्रमुख अनिल ताडगे, महेश सावंत, अविनाश राणे, परशुराम कासुळे आदी ावेळी उपस्थित होते. आ.शेलार यावेळी म्हणाले की, मराठा समाज बांधवांची आरक्षणाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार व महाराष्ट्रात महायुती सरकार कटीबद्ध आहे. आरक्षणाच्या मागणी संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी सविस्तर चर्चा याआधीच झाली असून पुन्हा या आठवड्यात चर्चा करून स्पष्टता आणू असेही ते म्हणाले. अ.भा.मराठा महासंघ अध्यक्ष दिलीप जगताप म्हणाले की आत्तापर्यंत सर्व निवडणुकांमध्ये महासंघाने भाजपाला पाठिंबा दिला आहे. यंदाही भाजपा विजयी होईल. मराठा आरक्षणाचा प्रश्न केंद्राच्या सहकार्याने सोडवण्याचा विश्वास वाटल्याने भाजपाला पाठिंबा देत असून आरक्षणाची मर्यादा वाढवून समाजाला आरक्षण द्यावे.